
03 TO 09 AUGUST 2020 - Page 1 (CRIME SANDHYA) new:Layout 1 01/08/2020 7:36 PM Page 1




गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ | अंक : ३३ | सोमवार दि. ०३ ऑगस्ट २०२० ते रविवार दि. ०९ ऑगस्ट २०२० | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

# संपूर्ण महाराष्ट्र कोरोनाच्या संकटामुळे झालाय त्रस्त खाजगी हॉस्पिटल रुग्णांची लूटमार करण्यात व्यस्त



लातूर/राम पाटोळे

संकटात सापडलेल्या माणसाला मदत करणे हाच खरा मनुष्य धर्म आहे. तर काही लोकं स्वतःचा जीव धोक्यात घालून संकटात सापडलेल्या लोकांना मदत करीत असतात. तर काही हरामखोर संकटात सापडलेल्या माणसाला कसे लुटता येईल आणि त्यातून आपला फायदा कसा होईल याचा विचार करीत असतात. सध्या कोरोनाच्या संकट काळात एकीकडे सरकारी रुग्णालयातील डॉक्टर आणि त्यांचे सहकारी घरदार तहानभूक विसरून कोरोन रुग्णांच्या सेवेत स्वतःला झोकून देत आहेत. तर दुसरीकडे खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांसाठी मात्र कोरोनाचे हे संकट म्हणजे खोऱ्याने पैसे ओढण्याचे साधन बनले आहे. त्यामुळे खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जाणाऱ्या कोरोना रुग्णाला आराम पडो अगर तो रुग्ण मारो! खाजगी रुग्णालये दहा-दहा लाख रुपयांची बिले बनवून रुग्णांच्या नातेवाईकांना अक्षरशः लुबाडत आहेत. बिल भरले नाही तर मृतदेह अडवून ठेवत आहेत.



डॉ. दिनेश वर्मा

खाजगी रुग्णालयातील या हरामखोरांनी अक्षरशः सरकारी नियम धाब्यावर बसवून प्रेताच्या टाळूवरचे लोणी खायची मोहीम उघडली आहे. कारण कोरोना रुग्णाच्या विविध चाचण्या त्याला उपचार दरम्यान दिली जाणारी ट्रिटमेंट याचे सरकारी दर निश्चित करण्यात आले असून त्याचा दरफलक प्रत्येक खाजगी रुग्णालयात लावणे बंधनकारक असताना तो दरफलक न लावता डॉक्टरांवर हल्ले झाल्यास कोणती शिक्षा या बाबतच्या माहितीचे फलक लाऊन रुग्णांच्या नातेवाईकांना घाबरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे रुग्णांच्या नातेवायीकांमध्ये संताप असून याच संतापातून लातूरच्या अल्फा हॉस्पिटलचा ...पान ६ वर

## डॉ.दिनेश वर्मा पुन्हा वादाच्या भोवऱ्यात!


अल्फा सुपर स्पेशालीस्ट हॉस्पिटलचे डॉ. दिनेश वर्मा हे वादग्रस्त डॉक्टर असून या पूर्वी एका स्टिंग ऑपरेशनद्वारे त्यांच्या गैर व्यवहाराचा पर्दाफाश करण्यात आला होता. त्यावेळी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून केरबा माने नावाच्या रुग्णाची अन्जिओप्लास्टी करायची होती. मात्र केरबाच्या मुलाकडे डॉ. दिनेश वर्मा याने ४० हजार रुपयांची मागणी केली होती. तसेच या बद्दल कुणालाही सांगायचे नाही अन्यथा बाहेर तुला ८० हजार रुपये खर्च करावे लागतील असे केरबाच्या मुलाला त्यांनी सांगितले होते. मात्र स्टिंग ऑपरेशनमध्ये या प्रकरणाचा पर्दाफाश होऊनही जिल्हा आरोग्य विभागाने त्यांच्यावर कारवाई केली नाही. तसेच लोकप्रतिनिधींनीही या गंभीर प्रकरणाची दखल घेतली नाही. त्यामुळे आजही रुग्णांना फसवण्याचे डॉ. दिनेश वर्मा याचे धंदे सुरु असल्याचा आरोप लातूर मधील जनता करीत आहे. अनारकलाच्या या प्रकरणाबरोबरच आणखी तीन प्रकरणे उजेडात आली आहेत. लातूर हा मराठवाड्यातील एक दुष्काळग्रस्त जिल्हा असून तिथल्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाकीची असताना अल्फा ...पान ६ वर

## मैत्रीच्या जाळ्यात अडकवून ब्लॅकमेल केले फेसबुकवरच्या मैत्रिणीमुळे चार लाख गेले

बुलडाणा/क्राईम रिपोर्टर

सोशल मिडिया हे खरे तर समाजप्रबोधनाचे एक मोठे मध्यम आहे. याच माध्यमाद्वारे समजला जोडण्याचे काम केले जाऊ शकते. चांगली माणसे एकत्र येवून ती समाजासाठी देशासाठी काहीतरी चांगले करू शकतात. पण आजकाल प्रत्येक चांगल्या गोष्टीचा दुरुपयोग सुरु आहे. फेसबुकसारखी माध्यमे तर ब्लॅकमेलिंग करून पैसे कमावण्याची साधने बनलीत. त्यातून फेसबुकवर मैत्री झालेल्या कित्येकांची आर्थिक फसवणूक झाली आहे. तर फेसबुकवरच्या मित्रांनी महिलांचे लैंगिक शोषण ही केले आहे. मात्र बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव येथे चक्क एका महिलेनेच आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने फेसबुकवरील मित्राला ब्लॅकमेल करून त्याच्याकडून २५ लाखांची खंडणी उकलण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी ४ लाख रुपये त्याने दिलेही. मात्र उर्वरित रक्कम देण्याऐवजी त्याने तिला पोलिसांच्या जाळ्यात अडकवून स्वतःची सुटका करून घेतली.





फेसबुकवर अनोळखी तरुणीसोबत त्याची ओळख झाली आणी तो मनातल्या मनात खुश झाला. सुरुवातीला तिनेच त्याला फोन केला. फोनवर दोघांचा हळूहळू संपर्क वाढत गेला. फोनवर गोड गोड बोलून तिने त्याला आपल्या जाळयात ओढले. जाळयात आलेल्या तरुणाने तिची भेट घेतली. ...पान २ वर

## पैशाच्या व्यवहारात कुणाचाही काहीच नसतो नेम सातशे रुपयांसाठी मित्रानेच केला मित्राचा गेम

नाशिक/क्राईम रिपोर्टर

पैसा हि माणसाची सगळ्यात मोठी गरज आहे. कारण जगण्यासाठी पैसा लागतो. पैसा हाती असेल तर त्यातून जगातली सगळी सुख विकत घेता येतात. म्हणूनच माणूस सतत पैशाच्या मागे लागलेला असतो आणि पै पैशासाठी तो दोस्ती यारी नाती गोती सर्व काही विसरून जातो. नाशिक मध्ये ७०० रुपयांच्या वसुली वरून दोन जिवलग मित्रांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला कि ज्याने उसने पैसे घेतले होते त्याचा रागाच्या भरात मित्रानेच खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





गेल्या आठवड्यात १९ जुलै रोजी सिन्नर ते नाशिक महामार्गावरील मोहदरी घाट परिसरातील टेकडीवर एका अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. या मृतदेहाबाबत सुरुवातीला सिन्नर पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती. या तरुणाचा खून झाल्याचे निष्पन्न झाले होते. या खूनाचा तपास नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे ...पान २ वर

## भाईगिरी त्याला खूपच महागात पडली आयुष्याची दोरी नातेवाईकानेच तोडली





आरोपी योगेश

कागल/क्राईम रिपोर्टर

व्यवसायातील दुष्मनी खूपच वाईट असते. कारण प्रत्येक जण आपला व्यवसाय वाढवण्यासाठी आपल्या प्रतिस्पर्ध्यावर सतत कुरघोडी करीत असतो किंवा त्याच्या प्रत्येक कामात काही ना काही अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये छोटी मोठी कामे करणारे जे ठेकेदार असतात रे एक तर त्या संस्थांमधील अधिकाऱ्यांना हाताशी धरून आपली कामे करून घेतात किंवा दादागिरीच्या जोरावर काम करून घेतात. अशाच दोन ठेकेदारांच्या धंद्यातील दुष्मनीतून एकाला आपले प्राण गमवावे लागले. विशेष म्हणजे हे दोघेही एकमेकांचे भावबंदच होते. पण व्यावसायिक दुष्मनीने एकाचा बळी घेतला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही हल्लेखोर आरोपींना अटक केली आहे.

कागल शहरातील सागांवकडे जाणाऱ्या महात्मा फुले वसाहतीत आकाश ऊर्फ मॅनर्स सोनुल हा आपल्या कुटूंबासह राहत होता.गेल्या तीनवर्षापुर्वीच त्याचा विवाह झाला होता.त्याला दीड वर्षाचा मुलगा ही आहे. तो कागल नगरपरिपेत खासगी कंत्रादार म्हणुन काम करीत होता.त्याला नगरपरिषदेकडून मक्तेदारीवर गटारी वैगेरे बांधकाम करण्याचे काम मिळत होते. हे काम तो आपल्या हाताखालील लोकांच्याकडून करून घेत होता. तसा आकाश हा थोडासा गुंड प्रवृत्तीचा असल्याने त्याच्या नादाला सहसा कुणी लागत नव्हते. गावात व भागात तो मॅनर्स नावाने ओळखत होता. त्याचे वागणे आणि राहणीमान ही गुंडप्रवृतीचे होते. गावात तो बुलेट घेऊन फिरत होता. लोक त्याला मॅनर्स दादा म्हणून बोलवत होते. तो प्रत्येकाला का रे च्या भाषेत बोलत होता. त्याचे काम कमी पण उचापती जास्त होत्या. डोळ्याला गॉगल लावून तो बुलेटवरून चालला की काहीजण त्याला मॅनर्स दादा आला म्हणून वाट करून देत होते. इतका त्याचा वचक त्याने निर्माण केलेला होता. नगरपरिषदेचा मक्तेदार म्हणुन लोक त्याला अलिकडे आपणहून आपल्या अडचणी सांगत होते. तो काही सरळ मार्गी नसल्याने त्याचे ही तो पैसे घेऊनच काम करीत होता.त्यातूनच लोक आपल्याला घाबरतात असा त्याने समज करून घेतलेला होता. तो ही काही धुतल्या तांदळासारखा ...पान ६ वर

## पैशाच्या जोरावर कुटुंबाचा छळ केला जन्मदात्या बापाचा मुलानेच खून केला





सोलापूर/क्राईम रिपोर्टर

कुटुंब प्रमुख ही एक जबाबदार व्यक्ती असते. त्यामुळे त्याने आपल्या कुटुंबात जबाबदारीने वागायला हवे. खास करून मुले मोठी झाली त्यांच्या समोर बापाचे वागणे सामानज्यसपणाचे असायला हवे. तरच मुलानाही बापा विषयी आदर वाटेल आणि त्याच्या आदराने मुले राहतील. पण बापच जर बेतालपणे वागू लागला आणि कुटुंबासाठी त्रापदायक ठरू लागला, तर कोणताही मुलगा अशा बापाची कदापि गय करणार नाही. सोलापूर जिल्ह्यातल्या शिरला गावात राहणाऱ्या संजय काळे याच्याकडे पैसा असल्याने तो पैशाच्या जीवावर अय्याशी करीत असे. कुटुंबाशी फटकळपणे वागत असे. कुटुंबाचा वेगवेगळ्या मार्गाने छळ करीत असे. अखेर बापाच्या या त्रासाला कंटाळून मुलानेच आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने बापाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात शिराळा गाव आहे. या गावाला शणि शिराळा हि नाव देण्यात आले आहे. कारण या गावात शनि महाराजांचे भव्यदिव्य मंदिर आहे. या गावात राहणारे संजय मारूती काळे (५५) हे गावातच बेकरीचा व्यवसाय करीत होते. तसेच ते व्याजाने पैसे देत होते. संजय काळे यांना दोन मुलगे आहेत. संसार त्यांना पाहिजे तसा सुरू होता. घरात ...पान २ वर

## १७ वर्षांचा मुलगा कामातून गेला क्राईम सिरियल बघून खून केला

पुणे/क्राईम रिपोर्टर




आजकालच्या मुलांवर नाटक, सिनेमा टीव्ही सिरीयल आणि इंटरनेटवरील वेगवेगळे गेम यांचा असा काही परिणाम झाला आहे, त्यांचे अभ्यासावरून तर लक्ष उडालेच आहे, पण त्यांचा बहुतेक वेळ आजकाल नको त्या गोष्टी पाहण्यात जातोय आणि ज्या गोष्टी त्यांनी सिनेमा, टीव्ही सिरीयल किंवा इंटरनेटवर पाहिल्यात त्याचे अनुकरण करण्याचा ते प्रयत्न करतात. त्यातून काही मुलांच्या प्राणावरही बेतले आहे. पबजी सारखे गेम बघून काही मुलांनी आत्महत्या केल्यात, तर क्राईम सिरीयल बघून काही मुलांनी अपहरण लुटमार आणि खुनासारखे गंभीर गुन्हे केलेत. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील आसखेड खुर्द येथे एका अल्पवयीन मुलाने क्राईम सिरीयल बघून एका अल्पवयीन मुलीची हत्या केल्याची भयंकर घटना घडली असून या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

चाकणमधील अल्पवयीन मुलीच्या हत्येने वेगळे वळण घेतले आहे. नात्यातीलच १७ वर्षीय मुलाने हत्या केल्याची ...पान २ वर

## बापाचा राग त्याने मुलावर काढला निष्पाप विद्यानंदाचा मुडदाच पाडला



मुंबई/एस.कुमार

काही लोकांचा स्वभाव मोठा विचित्र असतो. ते एकाचा राग दुसऱ्यावर काढतात आणि त्यात निरपराध माणसाचा जीव जातो. बऱ्याच वेळा दोन शेजाऱ्यांमध्ये कुठल्या ना कुठल्या कारणावरून भांडण झाले कि त्या भांडणाचा राग मनात ठेऊन कुटुंबातल्या एखाद्या व्यक्तीवर तो राग काढला जातो आणि रागाच्या भरात मग माणूस कुठल्याही थराला जातो. अशा वेळी तो लहान मोठ्याचाही विचार न करता मोठ्या माणसाचा राग लहान मुलावर काढतो.

मुंबईच्या मालवणी भागात घडलेल्या अशाच एका घटनेत एका तीन वर्षांच्या मुलाची शेजाऱ्याने गळा चिरून हत्या केली. त्या निष्पाप मुलाचा एवढाच गुन्हा होता कि त्याच्या वडिलांशी या शेजाऱ्याचे भिंती वरून भांडण झाले होते आणि याच भांडणातून त्या शेजाऱ्याने ...पान ६ वर

## पाच लाखांच्या खंडणीसाठी हनीट्रॅपची खेळी पोलिसांनी पकडली बोगस पत्रकारांची टोळी

बेळगाव/क्राईम रिपोर्टर



एखाद्याकडून पैसा उकळायचे असेल, मोठे काम करून घ्यायचे असेल तर त्याला कोणत्या ना कोणत्या प्रकरणात अडकवून ब्लॅकमेल केले जाते आणि आज काल ब्लॅकमेलिंगसाठी हनीट्रॅप वापरला जातो. कारण कोणताही पुरुष सुंदर महिलेच्या जाळ्यात सहजपणे अडकतो. वास्तविक पत्रकार म्हटला कि तो अन्यायाच्या विरोधात लढणारा म्हणून ओळखला जातो. पण आजकाल पत्रकारितेच्या क्षेत्रात बोगस आणि ब्लॅकमेलिंग करून पैसे उकळणाऱ्या पत्रकारांचा सूळसुळाट झाला आहे. मात्र अशा लोकांना चांगले आणि प्रतिष्ठीत पत्रकार विरोध करीत असल्याने बेळगावमध्ये एका प्रतिष्ठीत पत्रकाराला हनी ट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न बोगस पत्रकारांनी केला आणि त्याच्याकडे ५ लाखांची खंडणी मागितली. मात्र त्याने प्रसंगावधान राखून हा प्रकार पोलिसांना कळवल्याने त्याची या संकटातून सुटका झाली आणि तीन महिला व दोन पुरुषांसह पोलिसांनी ५ बोगस पत्रकारांना अटक केली. ...पान २ वर

पान १ वरून....

## मैत्रीच्या जाळ्यात अडकवून ब्लॅकमेल केले...

अर्थात या भेटीचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यासाठीच तिने त्याला बोलावले होते. तिने व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यासाठी आपले खास पंटर नेमले होते. त्याच्यासोबतच्या भेटीचे व्हिडीओ रेकॉर्डिंग हाती येताच तिने त्याला खंडणी मागण्यास सुरुवात केली. २५ लाख रुपये दिले नाही तर हा व्हिडीओ वायरल करण्याची धमकी, बलात्कार तसेच अॅट्रॉसिटीच्या कायद्यानुसार आत टाकण्याची देखील धमकी ही तरुणी त्याला देऊ लागली. कसा बसा त्याने चार लाखांचा वंदोबस्त करून स्थानिक गुन्हा शाखेशी संपर्क साधला व तक्रार देखील दाखल केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचला. खंडणीची रक्कम हाती घेण्यासाठी महिला व तिचे दोन साथीदार आले होते. त्यानंतर तिघे पोलिसांच्या जाळ्यात अलगद अडकले. हनी ट्रॅपची ही घटना बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथील असून धमकी देणाऱ्या तरुणीस तिच्या दोघा साथीदारांसह अटक करण्यात आली. काही दिवसांपूर्वी देऊळगाव राजा येथील एका तरुणाची सोशल मीडियाच्या माध्यमातून जालना येथील एका महिलेसोबत ओळख झाली. त्यानंतर दोघांचे संबंध वाढत गेले, भेटही झाली. पुढे त्या महिलेने मला आणि माझ्या मैत्रिणीला ब्युटी पार्लर सुरू करायचा आहे. त्यासाठी तुमचे दुकान भाड्याने हवे आहे, असे त्याला फोनवर सांगितले. मात्र आपले कोणतेही दुकान नाही असे सांगत त्याने फोन कट केला. त्यानंतर तिने पुन्हा त्याच्याशी अर्थात तक्रारदाराशी संपर्क केला. तुमच्या परिचयातील किंवा ओळखीच्या एखाद्या व्यक्तीचा गाळा भाड्याने मिळवून द्याल का? अशी विनंती तिने केली. अशा प्रकारे ती त्याच्या संपर्कात येत गेली, मात्र तिचा प्लॅन वेगळाच होता. पुढे त्यांच्या ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. पुढे काही दिवसात ही मैत्री घट्ट झाली. दोघांनी भेटण्याचा निर्णय घेतला. त्यांची भेट ही झाली. अर्थात तिच्याकडे याच्या पुढील प्लॅन तयार होता. तिचे दोन साथीदार त्यांच्या 'त्या' भेटीचा व्हिडीओ रेकॉर्ड करणार होते. त्याप्रमाणे तो अर्थात तक्रारदार भेटीला आला आणि तिने तिच्या साथीदारांच्या मदतीने त्याच्यासोबतच आपला व्हिडीओ गुपचूप तयार केला. पुढे त्या भेटीचा व्हिडीओ वायरल करून पैशाची मागणी तिने सुरु केली. पैसे न दिल्यास बलात्कार, अॅट्रॉसिटीची तक्रार दाखल करु आणि तुझे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करू, अशी धमकी तक्रारदाराला देण्यात आली आणि तक्रारदर घाबरला. तो विनंती करू लागला शिकार आपल्या जाळ्यात अडकल्याची जाणीव होताच या तिघांनी त्याच्याकडे २५ लाख रुपयांची खंडणी मागितली. त्यातील चार लाख रुपयांचा पहिला हप्ता आधी देण्यास सांगितले. मग हा सर्व प्रकार काय आहे हे तक्रारदाराच्या लक्षात आले. त्याने स्थानिक गुन्हे शाखेकडे आपली तक्रार नोंदवली. रोहिणी नितीन पवार (२९) असे त्या महिलेने स्वतःचे नाव तक्रारदारास सांगितले होते. जालना येथील जमुनानगर परिसरात रहात असल्याचे देखील ती त्याला म्हणाली होती. तिचे आणि तक्रारदाराचे व्हिडीओ तिचे साथीदार राहुल सर्जेराव गाडेकर (भिवगाव, देऊळगाव राजा) आणि सचिन दिलीप बोरडे (रा. वापरुळ) यांनी काढले असल्याचे तक्रारदाराने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. देऊळगाव राजा पोलिस स्टेशनला तक्रार दाखल होताच पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सापळा रचला. खंडणीच्या पैशांची मागणी करण्यासाठी आरोपींनी तक्रारदाराला फोन केला. देऊळगाव राजा बसस्थानक परिसरात तक्रारदार गेल्यानंतर ते त्याला दुचाकीवर बसवून गावाबाहेर चिखली-जालना बाय पास रस्त्यावर घेऊन गेले. तक्रारदाराने २५ लाखांपैकी चार लाख रुपयांचा पहिला हप्ता आरोपींना दिला. त्यानंतर तक्रारदाराने सापळा लावून बसलेल्या पोलिसांच्या पथकाला सुचक इशारा केला. त्यानंतर पोलिसांनी क्षणाचा वेळ न लावता या तिघांवर झडप घालत त्यांना जेरबंद केले. पोलिसांनी आरोपींकडून चार लाख रुपये, व्हिडिओ असलेला मोबाइल, दुचाकीसह मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र देशमुख, पोलीस उपनिरीक्षक नागेशकुमार चतरकर, मुकुंद देशमुख, रघुनाथ जाधव, लक्ष्मण कटक, भारत जंगले, अनुराधा उंबरहंडे यांनी ही कारवाई केली. दरम्यान, आरोपींनी बुलडाणा आणि जालना जिल्ह्यातील अनेक व्यक्तीना हनी ट्रॅपमध्ये अडकवून त्यांच्याकडून पैसे उकळले असल्याची माहिती प्राथमिक चौकशीतून समोर आली आहे. अटकेतील तिघांकडून फसवणूक झालेल्या व्यक्तींनी आरोपीविरोधात तक्रार करावी, त्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन गुन्हे शाखेने केले आहे.

## पैशाच्या व्यवहारात कुणाचाही काहीच नसतो ...

वरिष्ठ पोलिस निरिक्षक के.के.पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरित्या पुर्ण केला आहे. या अकस्मात मृत्यूच्या तपासात मयत तरुण हा अशोक बारकू महाजन (३८) आयटीआय कॉलनी श्रमिक नगर सातपुर नाशिक असल्याचे निष्पन्न झाले होते. मयताच्या डोक्यात हत्याराने वार करुन कुणीतरी त्याचा खून केला होता. खूनानंतर त्याचा मृतदेह मोहदरी घाटात फेकून देण्यात आला होता. याप्रकरणी सिन्नर पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न.५६६/२० भा.द.वि.३०२, २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक ग्रामीण जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक डॉ.आरती सिंह, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शर्मिष्ठा वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.के.के.पाटील व त्यांचे सहकारी करत होते. तपासाअंती मयत तरुण अशोक महाजन हा सिन्नर एमआयडीसी परिसरातील कंपन्यांमध्ये प्रॉक्सी पेंटींगची कामे करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सिन्नर एमआयडीसी परिसरात तपास करत होते. माहिती संकलीत करत मयताच्या परिचयातील मित्र संदिप मनोहर सोनवणे (२६) रा. बाहुले मळा, अशोकनगर, सातपुर-नाशिक याचे नाव पुढे आले. त्याची चौकशी केली असता खूनाचा उलगडा झाला. मयत अशोक महाजन व आरोपी संदिप सोनवणे हे गेल्या दिड वर्षापासुन मित्र होते. दिनांक १७ जुलै रोजी मयत अशोक महाजन याने संदिप मनोहर सोनवणे याचेकडून खर्चासाठी ७०० रूपये उधार घेतले होते. तसेच सिन्नर माळेगाव एमआयडीसी येथील एका इसमाकडून मयत अशोक यास १८ हजार रुपये घ्यायचे होते. ते पैसे घेण्यासाठी मयत अशोक महाजन याने संदिप सोनवणे यास १७ जुलै रोजी सोबत नेले होते. वाघ नावाच्या इसमाकडून मयत अशोक याने १८ हजार रुपयांची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर दोघे मित्र पुन्हा नाशिकला परत आले. परत येतांना वाटेत मोहदरी घाटात संदिप सोनवणे याने गाडी थांबविली व मयत अशोक महाजन यास उधारीचे सातशे रुपये मागू लागला. त्यावेळी अशोकने त्याला म्हटले की मी तुला आता पैसे नाही देणार नाही. मी तुला नंतर देईल असे सांगितले. त्यावर संदिपने त्याला म्हटले की तुझ्याकडे १८ हजार रुपये असून देखील तु मला माझे सातशे रुपये का देत नाही? यावरुन दोघात सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची व नंतर झटापट झाली.

या झटापटीत राग अनावर झाल्याने संदिपने बाजुस पडलेला एक मोठा दगड उचलुन अशोकच्या डोक्यात टाकला. त्यामुळे अशोकच्या डोक्यात मोठी जखम झाली व तो जागेवरच मयत झाला. अशोक महाजन मयत झाल्यावर संदिप सोनवणे याने त्याच्या खिशातील १८ हजार रुपयांची रोख रक्कम काढून घेत नाशिकच्या दिशेने पोबारा केला. अशा प्रकारे उधारीच्या पैशातून दोघा मित्रात झालेल्या वादातून हा खून झाल्याचे निष्पन्न झाले. आरोपी संदिप सोनवणे यास पुढील तपासकामी सिन्नर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. नाशिक ग्रामीण जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक डॉ.आरती सिंह, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शर्मिष्ठा वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक के.के.पाटील यांनी हा तपास पुर्ण केला. त्यांना या कामी स.पो.नि.अनिल वाघ, सहायक फौजदार प्रभाकर पवार, पोलिस हवालदार चव्हाणके, पो.ना. प्रितम लोखंडे, हेमंत गिलबिले, पो.कॉ. निलेश कातकाडे, किरण काकड, संदिप बहिरम यांनी परिश्रम घेतले.

## पैशाच्या जोरावर कुटुंबाचा छळ केला...

त्यांचा धाक, दरारा गरजेपेक्षा अधिक होता. तसेच हातात पैसा खेळत असल्यामुळे त्यांचा बाहेरख्यालीपणा वाढला होता. मात्र ऐवढे असूनही संजय काळे पत्नी व मुलांचा भयंकर छळ करीत होता. मुलं लहान होती तोपर्यंत सर्व काही ठिक होते. ते कुटुंब त्याच्या दहशतीखाली वागत होते. परंतु आता मुलं मोठी झाली होती. आणि मुलं मोठी झाल्यानंतर बापाने सावध भूमिका घेतली पाहिजे होती. पण संजय काळेचा घरी हम करे सो कायद्याचा धाक सुरूच होता. दिवसेंदिवस संजयचा त्रास वाढतच होता. घरात त्याने छळसत्रच सुरू केले होते. त्याच्या या छळाला त्याची पत्नी व मुलं कंटाळून गेली होती. त्यांना संजयच्या या त्रासातून कायमची मुक्ती हवी होती. आपला बाप काही सुधारणार नाही.कुत्राची शेपटी वाकडी ती वाकडीच ती काय सरळ व्हायची नाही त्यापेक्षा कुत्रालाच (संजय काळे) ठार मारलेले बरे असे ठरले. बापाचा कायमचा काटा काढण्यासाठी संजयचा मोठा मुलगा आकाश काळे (२०) याने आपल्या दोन साथीदारांसह बापाच्या हत्येचा कट रचला. यासाठी त्याने लक्ष्मण रघुनाथ बंदपट्टे (२७) आणि अल्लाउद्दीन उर्फ आलम बासू मुलाणी (३३) दोघे राहणार सुर्ली ता. माढा याना आकाशने आपल्या कटात सामील करून घेतले. यांनी संजय काळे याच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. त्या पैशासाठी संजय काळे या दोघांना सारखा टोचत होता. त्यामुळे हे दोघेही संजयच्या त्रासाला कंटाळून गेले होते. म्हणून हे दोघे संजयचा काटा काढण्यासाठी आकाशच्या कटात सामील झाले होते. संजय काळे हा दि.२५ जुलै रोजी शनिवारी रात्री करून जेवण झोपला होता.यानंतर रविवारी सकाळी संजय काळे घरातून गायब झाल्याचे कुटुंबियांच्या निदर्शनास आले. त्याचा त्यांचा छोटा हत्ती टेम्पो ही गायब होता. काळेच्या कुटुंबियांनी त्याचा शोध घेतला परंतु तो सापडला नाही. त्याचा मोबाईल फोन बंद होता. त्यामुळे पत्नीने व मुलाने टेंभुर्णी पोलीस ठाणे गाठून तो गायब असल्याची माहिती पोलिसांना दिली. दरम्यान इकडे शेवरे (ता.माढा) येथे अकलूज-टेंभुर्णी रस्त्याच्या पूर्वेस उजनी कॅनॉलपासून अर्धा कि.मी.अंतरावर कॅनॉलच्या भराव्याखाली एक टेम्पोसह (एम.एच.४५-६५७७) छातीच्या खालचा भाग पूर्णपणे जळालेल्या अवस्थेतील अनोळखी इसमाचा मृतदेह ग्रामस्थांना रविवारी ८.३० वा.सुमारास दिसून आला होता.मृताच्या चेहऱ्यावर गळ्यावर कोणीतरी तीक्ष्ण शस्त्राने निर्घृणपणे वार केलेले होते.तसेच पुरावा नष्ट करण्याच्या हेतून मृतदेहाच्या अंगावर टायर जळालेली स्टेपनी व जळून खाक झालेला टेम्पो दिसून आला होता.यामध्ये छाती व डोक्याचा भाग वगळता मृताचे संपूर्ण शरीर जळून खाक झालेले होते.अतिशय क्रूरपणे मारुन पुरावा नष्ट करण्याचा झालेला प्रयत्न यामुळे ही घटना पाहून या परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. संजय काळे याची शोधाशोध सुरू असताना शेवरे येथे मृतदेह मिळून आल्याची माहिती मिळताच काहीजणांनी तेथे जाऊन पाहिले असता तो मृतदेह संजय काळे याचाच असल्याचे निष्पन्न झाले.यामुळे संजय काळे याचा एवढ्या निर्दयपणे कोणी व का खून केला असा प्रश्न निर्माण होत आहे.मृतदेह मिळाल्याची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतला होता. याबाबत मयताचा मुलगा आकाश संजय काळे याने रीतसर फिर्याद दिली होती.या निर्घृण खुनाच्या तपासाचे मोठे आवाहन असताना टेंभुर्णी पोलिसांनी पोलीस अधिक्षक मनोज पाटील,अतिरिक्त पोलीस अधिक्षक अतुल झेंडे,विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे यांनी आरोपींच्या तपासासाठी एपीआय अमित शितोळे व एपीआय सुशील भोसले यांची दोन तपास पथके तयार करून व गुप्त माहितीगारा मार्फत ही शोध करण्यात येत होता. पोलिसांनी सुरुवातीस घरातून तपास सुरू करीत फिर्यादी मुलगा व आई यांचे जबाब नोंदविले यात तफावत असल्याने व घराची पाहणी केल्यामुळे संशयाची सुई मुलाच्या दिशेने जात असल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे कसून चौकशी करताच त्याने खुनाची कबुली देत दोन साथीदारांची नावे सांगितली. तसेच वडीलाच्या बाहेरख्यालीपणामुळे घरात सतत तणावाचे वातावरण असायचे वडील नेहमी घालून-पाडून बोलून अपमान करीत असत. त्यांचे चारित्र्य नीट नव्हते त्यांचे अनेक महिलांशी संबध होते. या नेहमीच्या भांडणास कंटाळलो होतो अशी माहिती दिली. वडिलांचे व्यवहार मुलास माहीत होते. काही दिवसांपूर्वी यातील आरोपी अल्लाउद्दीन उर्फ आलम मुलाणी यांचे बरोबर पैशाच्या देवाण-घेवाणीवरून वडिलांचे भांडण झाले होते. ही संधी साधून मुलाने या मुलाणी व लक्ष्मण बंदपट्टे या दोघाबरोबर शनिवारी एका पेट्रोल पंपावर बसून कट केला व त्याच रात्री तिघांनी मिळून घराच्या अंगणात झोपलेल्या बापावर रात्री १० वा. सुमारास तलवार व कोयत्याने वार करून निर्घृणपणे त्यांचा खून केला. तसेच रक्ताने माखलेली पांघरायची रग, गादी यांमध्ये मृतदेह गुंडाळून तो टेम्पोत टाकून आडमार्गाने त्यांनी शेवरे येथे कालव्याच्या साईडला नेऊन मृतदेह टेम्पोतील डिझेल अंगावर व टेम्पोवर टाकून पेटवून दिला. यानंतर पोलिसांनी बंदपट्टे यास सुर्ली येथे अटक केली तर अल्लाउद्दीन उर्फ आलम मुलाणी यास पळून जात असताना पुणे येथे जाऊन पकडले. या तिघांना माढा कोर्टात हजर केले असता सर्व आरोपींना न्यायाधीश एस.एस.सय्यद यांनी सहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. सरकारी वकील म्हणून विशाल सक्री यांनी तर आरोपीच्या वतीने अॅड संतोष कानडे यांनी काम पाहिले. टेंभुर्णी पो नि राजकुमार केंद्रे,ए पी आय अमित शितोळे,ए पी आय सुशील भोसले,असि. पोलीस फौजदार अशोक बाबर,पोहेकॉ अभिमान गुटाळ,दत्ता वजाळे, धनाजी शेळके,विनोद पाटील, बाळासो चौधरी,सायबर सेलचे अन्वर आतार यांनी यशस्वी तपास केला.यात आणखी कोणी सामील आहे का? याचा तपास सुरु आहे. टेंभुर्णी-अकलूज महामार्गावरील उजनी कालव्याच्या रस्त्यालगत काही नागरिकांना एक वाहन पूर्णपणे जळत असताना दिसले, नागरिक त्या वाहनाजवळ गेले असता त्यांना चेहऱ्यावर धारदार शस्त्राने वार केलेला मृतदेह दिसला, त्यानंतर तो जळून पूर्णपणे खाक झाला. करमाळा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. प्रशांत हिरे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली. पोलिसांनी २४ तासातच या हत्येचा गुंता सोडवला. त्यात त्यांना संजय काळे हे बेकरी चालक आहे, असे कळले. वडिलांच्या वादग्रस्त चारित्र्यामुळे त्यांच्यात कायम वाद व्हायचे. याचा बदला घेण्यासाठी त्याने लक्ष्मण बंदपट्टे आणि आलम मुलाणी या मित्रांची मदत घेतली. त्यांच्या मदतीने आकाशने वडिलांची हत्या केली. आकाशने वडिलांचा अतिशय क्रूरपणे खून करून त्यांचा मृतदेह टमटमसह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, याची त्याने कबुली दिली आहे. सद्या आरोपींना न्यायालयाने ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## पाच लाखांच्या खंडणीसाठी हनीट्रॅपची खेळी...

बेळगाव जिल्हयातील जमखंडी येथे बसवराज रामाप्पा खानगौडर हा बेळगाव जिल्हयातील एका कन्नड दैनिकाचा पत्रकार म्हणून काम करीत होता. तो शहरातील एक चांगला पत्रकार म्हणून ओळखला जात होता. त्याची चार चौघात उठबस होत असल्याने त्याला चांगला मानपान ही होता. तो आपल्या कामानिमित्य सारखा बेळगावला येज जात होता. बेळगाव येथीलच एकाने जंमखंडी येथून युट्यूबवर प्राईम न्युज चॅनेल सुरू केले होते. तो ही एक पत्रकारच होता. त्याला त्या कामाचा अनुभव नव्हता. तरीही या क्षेत्रात त्याला लवकर पुढे जायचे होते. म्हणून तो आपल्या चॅनेलचा विस्तार वाढविण्यासाठी येईल त्याला आपल्या न्युज चॅनेलचे ओळखपत्र देऊन पत्रकारीता करा म्हणून सांगत होता. हल्ली कुणी उठतो आणि युट्यूब चॅनेल सुरू करून पत्रकारिता करू लागतो.त्याला या कामाची माहिती असो अथवा नसो समाजात त्याला फक्त पत्रकार म्हणून वावारचे असते. या युट्यूब चॅनेलला कोणतेही रजिस्ट्रेशन अथवा एनआरआय नंबर लागत नसल्याने अशा बोगस पत्रकारांना पैसे मिळविण्यासाठी तो एक सोपा मार्ग झाला आहे. त्यामुळे इलेक्ट्रानिक मिडियातील विश्वाहर्तता कमी होऊ लागली आहे. या पत्रकाराने ही काहीजणांना आपल्या चॅनेलचे ओळखपत्र दिले होते. तो त्याच्या माध्यमातून काम करीत होता. पण त्याला म्हणावे तसे यश येत नव्हते. तो बसवराजच्या संपर्कात ही होता. ते दोघे चांगले मित्रही होते. बसवराज हा या फिल्डमध्ये कसे पैसे मिळवित आहे. हे त्याला चांगले माहित होते. म्हणून त्याने त्याने आपल्या चॅनेलला मदत करायला सांगितले होते. एक दोन वेळा बसवराजने मदत ही केली होती. तरीही त्या दोघांच्यातील व्यवसायीक स्पर्धा वाढली होती. पत्रकारीतेच्या क्षेत्रात बसवराज हा पुढे होता. यातूनच त्या दोघात आता मैत्री कमी आणि दुश्मणी वाढली होती. यातूनच त्या तथाकित पत्रकाराने बसवराज याला कोणत्या तरी एका प्रकरणात अडकवयाचे होते. त्यासाठी त्याने एक वेगळाच मार्ग शोधला होता. त्याने आपल्या चॅनेलच्या माध्यमातून अनेकांना ओळखपत्रे दिली होती. त्यामध्ये दोन नंबरचे धंदे करणारे ही होते. त्यातीलच सौंदती येथील गौरी लमाणी, रामदुर्ग येथील मंजुळा जुटेण्णवार,उमरगोळ येथील संगिता कनीकोप या होत्या. मागे एकदा बेळगाव जिल्हायात बनावट नोटांचे प्रकरण उघडकीस आले होते. त्या प्रकरणातील गौरी लमाणी आणि मंजुळा जुटेनण्णवर या आरोपी होत्या. तरीही त्या या प्राईम न्युज चॅनेलचे ओळखपत्र मिळवून समाजात बोगस पत्रकार म्हणून वावरत होत्या. या प्राईम न्युज चॅनेलचा पत्रकाराने आतापर्यंत आपली खरी ओळख ही लपवली होती.त्याने आपले खरे नांव पत्ता कोणाला सांगितला नव्हता. तो या तिघांच्या संपर्कातून बसवराज याला अडकवु पाहत होता. या तिघी ही दिसायला सुंदर आणि सुशिक्षीत होत्या. पण त्याचे कारनामे वेगळेच होते. त्याने या तिर्घीना बसवराज याला जाळ्यात ओढुन ब्लॅकमेल करण्यास सांगितले. त्याच्याकडुन ब्लॅकमेल करून मिळणारी रक्कम त्या तिघीना देतो असे सांगून बसवराज याला ब्लॅकमेल करण्याची सुपारी दिली. बसवराज याच्याशी या तिर्घीची थोडीफार तोंड ओळख होती. बसवराज हा बेळगाव येथे कामानिमित्य कायम येत जात असतो हे त्या तिघीना माहित होते. तसेच महिलांच्यात इंटरेस्ट आहे हे ही या तिघीना माहित होते. आपल्या सौंदर्याचे जाळ्यात त्याला ओढुन त्याला ब्लॅकमेल करण्याचे त्यांनी ठरवुन त्यांनी त्याला सोमवार दि.२७ जुलै रोजी बेळगावला फोन करून बोलावून घेतले. बेळगाव येथील नेहरूनगर येथील एका लॉजमध्ये त्याला बोलावून घ्यायचे ठरले. त्या तिर्घीनी त्याच्यावर असे काही सौंदर्याचे जाळे टाकले की तो त्यात अडकला होता. त्याला ही महिलांच्यात इंटरेस्ट होता हे त्या तिघीना माहित होते. आणि या तिघीही धुतल्या तांदाळासारख्या नाहीत हे त्याला ही माहित होते. म्हणुन त्यांनी फोन केल्यावर तो वेगळ्याच विचाराने बेळगावला जमखंडीहुन आला. त्या तिर्घीनी ही त्याला बेळगाव मधील नेहरूनगर येथील एका लॉजवर बोलावले होते. तो त्या लॉजच्या रुमवर आल्यावर तेथे मंजुळा ही एकटीच होती. तिने त्याला गोड बोलुन कपडे काढायला लावले. त्याचवेळी तेथे गौरी ही आली होती. एक से भले दो म्हणुन तो ही काही बोलला नाही. त्या दोघींच्याबरोबर तो रोमान्स करीत असताना त्याचे व्हीडिओ चित्रण एका पडद्याआडुन संगिता कनकीकोप ही करत होती. हा प्रकार बसवराज याला माहित नव्हता. त्याचा रोमान्स बहरत चालला असताना अचानक दरवाजा उघडून तेथे रघुनाथ धुमाळे आणि सदाशिव चिप्पलकटी हे दोन तरूण तेथे आले त्यांनी दरवाजा लावून घेऊन बसवराज याला मारहाण करून तु स्वतःला पत्रकार म्हणुन घेतो. आणि येथे दोन दोन महिलांच्याबरोबर मजा मारतोस काय? असे म्हणत त्याला दमदाटी दयायला सुरूवात केली. त्याचवेळी पडदया आड लपून बसलेली संगिता ही मोबाईल घेऊन बाहेर आली. ते आता पाचजण झाले होते. त्यांनी बसवराज याला दमदाटी करून मारहाण करुन तुझे अश्लिील चाळे केलेली किल्प बनवली असुन ती किल्प आम्ही प्राईम न्युज या युट्यूब चॅनेलवर प्रसारीत करून तुझे अनैतिक धंदे उघड करू अशी धमकी दिली. त्याचबरोबर पाच लाखांची खंडणी दे. तु ही पत्रकारीतेचा गैर वापर करून पैसे मिळविले आहेस. पाच लाखांची खंडणी दे. नाही तर या दोघी तुझ्या विरोधात बलात्काराची केस पोलीसात दाखल करतील. आता सगळा मामला बसवराज याच्या लक्षात आला. त्याने त्याना पैसे देतो पण मला या फंदात अडकवू नका. असे म्हणून एक फोन करण्याची विनंती केली. त्यांनी ही पैसे मिळणार म्हणून त्याला फोन करू दिले. त्यावेळी त्याने त्यांची नजर चुकवित माळमारूती पोलीस स्टेशनला आपल्या मोबाईलवरून फोन लावला. आणि थोडक्यात घटना सांगून पोलीसांना नेहरूनगर येथील त्या लॉजवर येण्यास सांगितले. त्या पाच मिनिटांच्या अवधीत पोलीसांनी ही त्याला काही सुचना देऊन खंडणी मागणाऱ्याना बोलण्यात गुंतवून ठेवण्यास सांगितले. बसवराजने ही तसेच केले. तो त्याच्याबरोबर पाच लाख कमी करा. मी दोन दोन दिवसात पैशाची व्यवस्था करतो असे सांगत बोलण्यात त्याना गुंतवून ठेवले. काही वेळातच तेथे पोलीस दाखल झाल्यावर त्या पाचजणांची पाचावर धारण बसली. तेवढयात मार्केट पोलीस स्टेशनचे एसीपी. एस व्ही बरमणी आणि माळमारूती पोलीस स्टेशनचे पो.निरी.बी.आर.गड्डेकर हे ही आपल्या सहकार्यासह दाखल झाले. त्यांनी या घटनेची माहिती घेऊन संगिताकडून मोबाईल घेऊन खातरजमा करून घेतली. त्या मोबाईलमध्ये बसवराजे मंजुळा आणि गौरी बरोबरचे त्या अवस्थेतील फोटो ही होते. पोलीसांना बघून आधीच त्याची बोबडी वळाली होती. पोलीसांनी त्या पाचजणाकडे चौकशी करून खंडणी मागितल्याची खात्री करून घेतली. त्याचे मोबाईलवरील बोलणे ही रेकॉर्डिंग झाल्याने ते अपसुकच या जाळ्यात अडकले होते. पोलीसांनी त्यांना माळमारूती पोलीस स्टेशनला आणले. तेथे त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यावर त्या पाजजणांनी बसवराज याला मारहाण करून नग्न फोटो घेतल्याचे आणि त्याच्याकडे पाच लाखांची खंडणी कोणत्या कारणासाठी मागितली असल्याचे सांगितले. पोलीसांना त्याच्याकडे प्राईम न्युज चॅनेलचे बनावट ओळखपत्र असल्याचे दिसून आले. ते पोलीसांनी जप्त केले. या घटनेची लेखी फिर्याद बसवराज रामाप्पा खानगौडर (वय ४०) याच्याकडून घेतली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी या घटनेतील गौरी लक्ष्मण लमाणी (वय २८.रा.यल्लमाचा तांडा सौंदती.) मंजुळा लक्काप्पा जुटेनवार (वय २९ रा.मुळ चुंचनूर ता.रामदुर्ग सध्या सौंदती), संगिता प्रकाश कनकीकोप (वय ३०रा. उगरगोळ,सौंदती.) रघुनाथ ग्यान धुमाळे (वय २८रा.मुळ हुलगबाळी सध्या अथणी खडेबाजार) सदाशिव सिध्दाप्पा चिप्पलकट्टी (वय ३३ रा.नेहरूनगर बेळगाव) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १२० (बी)३८४,३९५,सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदवून रितसर त्याना अटक केली. त्याना बेळगाव येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता. मा.न्यायालयाने त्यांना १५ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. हे पाचही जण प्राईम न्युज चॅनेलच्या बनावट ओळपत्राच्या आधारे जिल्हयातील अनेक लोकांना गंडा घालत आल्याचे व त्यांना हनी ट्रपमध्ये अडकवून खंडणी उकळत असल्याचे पोलीस तपासात आढळुन आले. मागे एकदा या टोळक्याने यरगट्टी येथील एका मोठया हॉटेल व्यवसायीकाला हनी ट्रपमध्ये अडकवून त्याच्याकडून ही त्यांनी खंडणी उकळली होती. यातील मंजुळा, गौरी आणि संगिता या आपल्या सौंदर्याचा वापर करून सावजांना आपल्या जाळ्यात ओढत होते. आणि त्याच्याबरोबर सलगी करून ब्लॅकमेल करून खंडणी उकळत होते. तसाच हनी ट्रपचा प्रकार करून बसवराज या पत्रकाराला ब्लॅकमेल करून त्याच्याकडून खंडणी उकळण्याचा त्याचा प्रयत्न होता. परंतु त्याच्या सर्तकतेमुळे आणि पोलीसांनी केलेल्या तत्पर हालचालीने त्याचा प्रयत्न फसला. आणि न्यायालयीन कोठडीत जाण्याची वेळ त्यांच्यावर आली. सध्या कोरोनाचे संकट असल्याने पोलीसांनी या पाचही जणांची कोव्हिड चाचणी केली. त्याचे अहवाल निगटिव्ह आल्याने पोलीसांनी त्याची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली. एका पत्रकाराने दुसऱ्या पत्रकाराला अशा प्रकारे अडकवून त्याच्याकडून खंडणी मागण्याचा केलेल्या प्रयत्नाने जिल्हयात आणि कर्नाटक राज्यात याची चर्चा होऊ लागली आहे.

## १७ वर्षांचा मुलगा कामातून गेला...

धक्कादायक बाब तपासात समोर आली आहे. तृतीयपंथी चिडवते म्हणून या मुलाने हे कृत्य केल्याचं कबूल केलं आहे. क्राईम पेट्रोल, सावधान इंडिया, दाक्षिणात्य कंचना सिनेमा पाहून हत्या करुन पुरावे लपवल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. त्यानंतर चाकण पोलिसांनी आधी अटक केलेल्या तिघांना सोडण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. हत्या झालेली मुलगी ही हत्या करणाऱ्या मुलाची मावशी लागते. दोघांच्या वयात साम्य असल्याने लहानपणापासून ते एकमेकांना चांगले ओळखत होते, शिवाय थोपटवाडी या गावातच रहायला असल्याने एकमेकांच्या घरी येणं-जाणं ही सुरू होतं. हा अल्पवयीन मुलगा भारुडाचे कार्यक्रम करायचा आणि त्यात स्त्री पात्र करत असे. त्यामुळे मयत मुलगी त्याला तृतीयपंथी हावभाव का करतो, तसेच का हसतो असं म्हणून चिडवत असे. पण वारंवार असं घडत असल्याने तो संतापला होता. त्याची सहनशीलता संपलेली होती. अशातच तो क्राईम पेट्रोल, सावधान इंडिया आणि दाक्षिणात्य कंचना पाहू लागला. तसेच ब्लू फिल्मचीही त्याला आवड होती. पण गुन्हेगारांचा छडा कसा लावला या दाखवल्या जाणाऱ्या मालिकेतून त्याने हत्या आणि पुरावे नष्ट करण्याच्या अनेक कल्पना पाहिल्या. यातूनच तृतीयपंथी म्हणून हिणवणाऱ्या मावशीचा काटा काढायचं त्याने कट रचला. २४ जुलै रोजी घरी बहीण आणि दाजी येणार असल्याने अल्पवयीन मावशी स्वयंपाकाला लागणाऱ्या वस्तू आणण्यात व्यस्त होती. दुपारी एकच्या सुमारास ती घरातून बाहेर पडली. तीन किलोमीटर अंतरावरील किराणा मालाच्या दुकानातून ती साहित्य घेऊन, अल्पवयीन मुलाच्या घरातून मटकी घेऊन जाणार होती. हे त्या अल्पवयीन मुलाला ठाऊक होतं. त्यामुळे त्याने मावशीच्या मार्गावरील ओढ्यालगतच्या निर्जनस्थळी एक दगड आणि झाडांची फांदी आणून ठेवली. किराणा मालाच्या दुकानातून आलेल्या मावशीच्या हातात त्याने मटकीचा डबा ठेवला आणि खुसकीच्या मार्गातून तो ओढ्यालगत पोहोचला. मावशी तिथे पोहचताच त्याने तिच्यावर हल्ला केला आणि जमिनीवर पाडले. ती ओरडेल म्हणून तोंडात बोळा घातला आणि डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. मग मृतदेह खांद्यावर घेत एका झुडपात टाकला. तिच्यावर कोणीतरी अत्याचार केल्याचं भासवण्यासाठी तिला विवस्त्र ही केलं आणि पुरावा नष्ट करण्याचा हेतूने तिचे कपडे आणि मोबाईल किराणा मालाच्या पिशवीत भरुन दुसरीकडे लपवले. मग घरी जाऊन स्वतःचे कपडेही नजरेआड केले. नंतर अल्पवयीन मावशीचा शोध घेण्यासाठी तोही बाहेर पडला, बराच शोध घेतल्यावर अन्य एका नातेवाईकाला मृतदेह झुडपात आढळला. त्याचवेळी हत्या करणाऱ्या अल्पवयीन मुलाने घटनास्थळी न जाताच मृत मावशीच्या बहीण आणि भावाला तिची हत्या झाल्याचं सांगितलं. चौकशी वेळी ही बाब पोलिसांना संशयास्पद वाटली. पोलिसांनी अंत्यविधी पार पडू दिला आणि पुन्हा या अल्पवयीन मुलाची चौकशी केली, तेव्हा किराणा मालाच्या पिशवीत काय-काय होतं हे त्याला विचारलं. त्याने प्रत्येक वस्तूच नाव घेतलं, त्यामुळे पोलिसांचा संशय आणखी बळावला. तुला हे सर्व कसं काय माहीत, असा पोलिसांनी उलट प्रश्न विचारताच त्याची बोबडी वळली. तिथेच पोलिसांनी हत्येचा छडा लावला. थोपटवाडी येथील १७ वर्षीय मुलीचा विवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती. २४ जुलै रोजी दुपारी सव्वा एकच्या सुमारास किराणा माल आणण्यासाठी ही मुलगी बाहेर पडली होती. घरापासून पंधरा मिनिटांच्या अंतरावर हे किराणा दुकान आहे. पण तिला घरी यायला तीन वाजतील, असं तिने तिच्या दाजींना फोन करुन कळवले होते. पण बराचवेळ झाला तरी ती परतली नाही, म्हणून तिला फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु झाला. पण तिच्याकडून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता. गावात आणि मैत्रिणींकडे ही कुटुंबीयांनी विचारणा केली. मात्र तिचा शोध लागत नव्हता, मग गावालगत शोधमोहीम सुरु झाली. अखेर रात्री सातच्या सुमारास कॅनॉल शेजारी तिचा मृतदेह आढळून आला. डोक्यात अवजड वस्तूने प्रहार करत तिची हत्या करण्यात आली होती. घरापासून काही अंतरावर असणाऱ्या किराणा मालाचे दुकान आहे. चाकण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, पंचनामाही केला. मुलीच्या कुटुंबियांकडून अधिकची माहिती घेतली. तेव्हा २०१८ मध्ये मृत मुलीची छेडछाड झाल्याचं कुटुंबीयांनी सांगितलं. त्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारही दाखल करण्यात आली होती. त्यांच्यावरच कुटुंबीयांनी संशय घेतला असून तिघांविरोधात हत्येचा गुन्हा ही दाखल केला होता.

# ट्रक हायजॅक करणारी टोळी जेरबंद; २३ लाखाचा माल हस्तगत

**नाशिक/प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात २० जुलै रोजी नाशिक ते पेठ दरम्यान गुजरात महामार्गावर मालवाहू ट्रक चालक व क्लिनरला लुटण्याचा प्रकार घडला होता. त्या घटनेत ट्रक चालकासह क्लिनरला मारहाण करुन ट्रक हायजॅक करण्यात आला होता. गुजरात महामार्गावर रासेगाव शिवारात २० जुलै रोजी मालवाहु ट्रक (केए ५६-१९४५) वरील चालक अनिलकुमार बॅनर्जी (रा.संगवळणी, जि.बिदर, कर्नाटक) यास अज्ञात आरोपींनी कार आडवी लावून थांबवले होते. त्यामुळे थांबलेल्या ट्रकमधून चालक व क्लिनरला ओढून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली होती. तसेच चालक अनिलकुमारच्या ताब्यातील मालट्रक हायजॅक करण्यात आला होता. ट्रकमधील कॉटनचा माल व अशोक लेलंड कंपनीची ट्रक असा एकुण २६ लाख रूपये किंमतीच्या मुद्देमालाची जबरी लुट करण्यात आली होती. लुटमारीच्या या घटनेबाबत दिंडोरी पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हा दिंडोरी पोलीस स्टेशनला गु.र.न. १५३/२०२० भा.द.वि ३९२, ३४१, ३२३, ३४ नुसार दाखल करण्यात आला होता.



या गुन्हयाची नाशिक ग्रामीण जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक डॉ. आरती सिंह यांनी गांभिर्याने दखल घेतली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक के.के.पाटील यांच्यासह त्यांच्या पथकावर या गुन्हयाच्या तपासाची समांतर धुरा सोपवण्यात आली होती. या गुन्हयाचा तपासात गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली.

या गुन्हयातील लुटमार करणारे गुन्हेगार मालेगाव शहर परिसरातील असल्याची खात्रीशीर बातमी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली होती. मालेगाव शहरातील देवीचा मळा परिसरात सापळा रचुन संशयीत अजहर खान वाजीद खान उर्फ अज्जु (३०) रा. उमराबाग, देवीचा मळा, मालेगाव यास शिताफीने ताब्यात घेण्यात आले. पोलिसी खाक्या दाखवून त्याच्याकडून माहिती घेण्यात आली. मालेगाव शहरातील त्याचे इतर चार साथीदार या गुन्हयात असल्याचे त्याने कबुल केले. कार आडवी लावून ट्रकवरील चालक व क्लिनरला मारहाण करून ट्रक हायजॅक केल्याची त्याने कबुली दिली. तसेच ट्रकमधील मालाची जबरी चोरी केल्याची त्याने कबुली दिली. ट्रकमधील कॉटनचा माल विक्री केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. ताब्यातील अझहर व त्याच्या साथीदारांनी केलेले दिंडोरी, देवळा व कसारा पोलीस स्टेशनला दाखल असलेले जबरी लुटमारीचे तिन गुन्हे उघडकीस आले आहे. गुन्हयात वापरलेली टोयोटा कार (एमएच ०३ बीई ०३८२) हस्तगत करण्यात आली. मालट्रक मधील लुट करण्यात आलेले १५ लाख रुपये किंमतीचे ४०९ कॉटनचे बंडल व मालट्रक असा २३ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपी अजहर खान याच्या इतर साथीदारांचा स्थानिक गुन्हे शाखा व व दिंडोरी पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी तपास करत आहेत. ताब्यातील आरोपी महामार्गावरील सराईत गुन्हेगार असुन त्याच्याकडून गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक डॉ.आरती सिंह, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शर्मिष्ठा वालावलकर मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी (कळवण विभाग) सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक के.के.पाटील, दिंडोरी पोलीस स्टेशनचे पो.नि.अनिल बोरसे, स.पो.नि. संदिप दुनगहु, स.पो.नि. स्वप्निल राजपुत, पो.उ.नि. कल्पेशकुमार चव्हाण, स.पो.उ.नि रामभाउ मुंढे, पोहवा दिपक आहिरे, पुंडलिक राउत, दत्तात्रय साबळे, गणेश वराडे, नामदेव खैरनार, वसंत महाले, सुहास छत्रे, पोना प्रविण सानप, अमोल घुगे, विश्वनाथ काकड, वसंत खांडवी, हेमंत गिलबिले, चेतन संवत्सरकर, राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, प्रदिप बहिरम यांच्या पथकाने जबरी लुटमारीच हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

मुंबई : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज विधानभवनात महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (कार्यभार) राजेंद्र भागवत, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव महेंद्र काज, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या अर्धपुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

### गुरुपदप्पा सगरे यांचे निधन

औसा : येथील गुरुपदप्पा शरणाप्पा सगरे वय ७० वर्षे यांचे शुक्रवार दि.३१ जुलै २०२० रोजी सकाळी लातूर येथे उपचारादरम्यान निधन झाले आहे. दोन दिवसापासून त्यांना श्वसनाचा त्रास होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक विवाहित मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीमध्ये कार्यकर्ता व औसा विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे . त्यांच्या पार्थिवावर लातूर येथे सिद्धेश्वर मंदिराजवळील लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### लोकमान्य टिळक यांना अभिवादन!

मुंबई : लोकमान्य टिळक यांच्या स्मृतीशताब्दीच्या निमित्तानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना अभिवादन केले असून लोकमान्य टिळकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा, सार्वजनिक उत्सवांच्या माध्यमातून उभारलेली लोकचळवळ, त्यांचे राष्ट्रभक्तीचे विचार आपल्या सर्वांना देशासाठी काम करण्याची सदैव प्रेरणा देत राहतील, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकमान्य टिळकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. लोकमान्य टिळकांच्या स्मृतीशताब्दीनिमित्त अभिवादन करताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, लोकमान्यांनी या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्वं केलं. देशवासियांच्या मनात राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करुन एकजूट करण्याचं मोठं काम त्यांनी केलं. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंहगर्जना केली, असं आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

### शिवाजी माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश!

लातूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावी प्रमाणपत्र परीक्षेत लातूरच्या शिवाजी विद्यालयातील एकूण ३३६ विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळविले तर १४८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह,१०३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. राम अशोकराव भोसले हा विद्यार्थी ९८.२०% गुण घेत विद्यालयातून सर्वप्रथम आला असून ९८% गुण घेत प्रेरणा प्रशांत नाकील ही विद्यार्थीनी सर्वद्वितीय आली आहे तर साक्षी तुकाराम बरुरे या विद्यार्थिनीने ९७.६०% गुण घेत तिसरा क्रमांक मिळविला. विद्यालयाचा निकाल ९८.५१% टक्के लागला असून सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्था प्रमुख शेषराव मोहिते पाटील, सचिव अजय रामचंद्र जाधव, समन्वयक नरेंद्र पाटील, कोषाध्यक्ष मारोती रामेगावे यांच्यासह सर्व संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### तालुक्यातील अनेक शाळांना शंभर टक्के यश

वाडा : तालुक्यातील अनेक शाळांनी १०० टक्के यश संपादन केले असून ९० टक्केच्या वर बहुतेक शाळा आहेत. विशेष म्हणजे वाडा तालुक्यातील आश्रमशाळा तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांचे निकाल कौतुकास्पद लागले आहेत. निकाल ऑनलाइन जाहीर झाला असल्याने तो मोबाईल वर देखील पाहता येत असल्याने अनेक विद्यार्थी मोबाईलवर निकाल पाहण्यात मग्न असल्याचे दिसून आले. वाडा तालुक्यातील सरस्वती विद्यामंदिर कंचाड, शारदा विद्यामंदिर नेहरोली, के.जी.पाटील देवघर, गुरुदेव चैतन्य, खैरे-आंबिवली हायस्कुल, आश्रमशाळा गुहिर, अनुदानित आश्रमशाळा असनस, माध्यमिक आश्रमशाळा आंबिस्ते, रावतेपाडा हायस्कुल, लिटिल एंजल वाडा व गोवर्धन गुरुकुल या सर्व शाळांचे निकाल १०० टक्के लागले असून विशेष म्हणजे जिल्हापरिषदेने पहिल्यांदाच सुरू केलेल्या उच्च माध्यमिक शाळांपैकी वरसाळे शाळेचा ९७.८२ टक्के तर डाहे शाळेचा १०० टक्के इतका निकाल लागला आहे.

## किल्लारी पोलिसांची धाडसी कारवाई

# ८ लाखांच्या चोरीच्या १३ मोटर सायकल जप्त



**औसा/प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक लातुर डॉ.राजेंद्र माने, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.हिम्मत जाधव ,औसा उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांचे मार्गदर्शनाखाली तसेच प्रभारी अधिकारी किल्लारी पोलीस ठाणे विनोद मेत्रेवार यांचे देखरेखीखालील किल्लारी पोलीस ठाणेच्या पथकाने धाडसी कारवाई करुन चोरीस गेलेल्या अंदाजे ८ लाख रुपयेच्या १३ मोटर सायकल जप्त केल्या. कार्ला ता.औसा जि.लातुर येथील अजय राजेंद्र काळे वय २५ वर्ष यास नाकाबंदी दरम्यान ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, सदर आरोपीने पुणे व परीसरातुन मोटर सायकल चोरुन आणुन लातुर जिल्ह्यात विकल्याचे सांगीतल्याने त्यास अटक करुन तपासादरम्यान १३ मोटर सायकल अंदाजे किमंत ८ लाख रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन आरोपीच्य मुसक्या आवळल्या. सदरची कारवाई पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे, पोहेका अनिल शिंदे, पोहेका गौतम भोळे, आबासाहेब इंगळे, गणेश यादव, उमाकांत चपटे यांच्या पथकाने केली.

# लॉकडाऊन पाळू नका, सर्व दुकानं उघडा –प्रकाश आंबेडकर

**औरंगाबाद/प्रतिनिधी**



१ तारखेपासून सर्वांनी दुकानं, टपऱ्या टायपिंग इन्स्टिटय़ूट उघडा तसेच रिक्षावाल्यांनीसुद्धा फिरायला सुरू करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी जनतेला केले. औरंगाबाद येथील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जे लॉकडाऊन आलंय त्याला मान्य करू नका. लॉकडाऊनच्या सुचना मान्य न करता आधीसारखंच जीवन सुरू करा असे देखील आंबेडकर म्हणाले. आमचा लॉकडाऊनला पाठिंबा नाही हे दर्शवण्यासाठी ज्या झेंड्याला तुम्ही मानत असाल तो झेंडा लोकांनी घरी, गच्चीवर फडकवण्याचे आवाहन त्यांनी जनतेला केले. तिरंगा फडकवलात तर अधिक चांगलं होईलं असेही ते म्हणाले. असं आवाहन केल्याने माझ्यावर गुन्हा दाखल करा अटक करा, मी घाबरत नाही असेही ते म्हणाले. जे हाल परराज्यातील कामगारांचे झाले तेच हाल लहान लहान उद्योजकांचे होत आहेत. लोकांची उपासमारीची परिस्थिती आली आहे. ८० कोटी कुटुंबांना अन्नधान देऊ म्हणले होते मात्र ते वाटलेलं काही दिसत नसल्याचं ते म्हणाले. कोरोना संदर्भात सत्य स्थिती मांडायला राज्य किंवा केंद्र शासनाकडे राजकीय हिम्मत आणि नेतृत्व नसल्याची टीका प्रकाश आंबेडकर यांनी केलीय. भूकबळी आणि इतर आजारामुळे लोक मरत आहेत. हे लॉकडाऊन चक्रामध्ये दोन्ही शासन स्वतःहून अडकलेत. बाहेर पडण्याचा रास्ता त्यांना दिसत नाही. सर्वसामान्य जनतेनेच शासनाला रास्ता दाखवण्याची गरज आहे. ३ ऑगस्टला रक्षाबंधन असल्याने सार्वजनिक वाहतूक सुरू करा असं आवाहन त्यांनी शासनाला केलंय.

# राज्यातील पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा, अभ्यासक्रमात २५ टक्के कपात!

**मुंबई/प्रतिनिधी**

सीबीएसईने ३० टक्के अभ्यासक्रम कमी केल्यानंतर आता राज्य शिक्षण मंडळाने सुद्धा कमी करावा अशी मागणी पालक, शिक्षकांकडून केली जात होती. या मागणीचा गांभीर्याने विचार करत आता शिक्षण विभागानेही पहिली ते बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम २५ टक्के कपात करून विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. एकीकडे शाळा बंद आहेत, तरी शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू करण्यात आले. ऑनलाइन माध्यमातून हे शिक्षण देत असताना त्याला सुद्धा काही मर्यादा आहेत. त्यात अभ्यासक्रम पूर्ण कसा होईल, याबाबत प्रश्न विद्यार्थी शिक्षकांना पडलेला पाहायला मिळत होता. आता अभ्यासक्रम कमी केल्याने विद्यार्थ्यांना काहीसा दिलासा नक्कीच मिळणार आहे. कारण दहावी आणि बारावी बोर्डाचा अभ्यास करताना अभयसक्रम लवकर संपवण्याचा प्रयत्न असतो. त्यात आता अभ्यासक्रम कमी केल्याने वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करणे शक्य होईल. अभ्यासक्रमाची यादी संचालक, राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्यात आणि देशात कोरोनाचं संकट असताना देखील आपण शैक्षणिक वर्ष २०२०-२१ १५ जून रोजी सुरु केलं. शाळा अद्याप सुरु न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात तणाव किंवा दडपण येऊ नये, यासाठी पहिली ते बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम कमी करण्याच्या निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे, असं राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी म्हटलं आहे.

# भावाचा मृतदेह घरात ठेऊन परीक्षा दिलेल्या रियाचं यश, निकाल येताच कुटुंबिय भावूक

**हिंगोली/प्रतिनिधी**

तालुक्यातील सरकळी येथील रिया अनिल खंदारे ही विद्यार्थीनी हिंगोलीच्या आदर्श विद्यालयात इयत्ता दहावीमध्ये होती. तर तिचा एकुलता एक लहान भाऊ गौरव खंदारे आठव्या वर्गात शिक्षण घेत होता. आज सकाळपासूनच सरकळी येथील अनिल खंदारे यांच्या घरात धिरगंभीर वातावरण होते, मुलगी रिया हिचा दहावीचा निकाल काय लागणार याकडे सर्वांचे लक्ष होते, दुपारी एक वाजता निकाल जाहिर होताच संपूर्ण कुटुंबच ढसाढसा रडले. लहान भावाचा मृतदेह घरात ठेऊन परिक्षा दिलेल्या रियाने विज्ञान विषयात ७९ गुण मिळविलेच तर एकूण ८१.२० टक्के गुण मिळविले आहेत.

हिंगोली तालुक्यातील सरकळी येथील रिया अनिल खंदारे ही विद्यार्थीनी हिंगोलीच्या आदर्श विद्यालयात इयत्ता दहावीमध्ये होती. तर तिचा एकुलता एक लहान भाऊ गौरव खंदारे आठव्या वर्गात शिक्षण घेत होता.



अनिल खंदारे यांनी गॅस एजन्सीवर काम करून प्रतिकुल परिस्थिती असतांना दोन्ही मुलांना उच्च शिक्षण देऊन अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले. रिया आणि गौरव यांच्यात अभ्यासातही स्पर्धा होत होती.

दरम्यान, १० मार्च पासूनच गौरवला ताप येऊ लागला. त्याला उपचारासाठी हिंगोली येथून नांदेडला हलविले. मात्र तेथे उपचार सुरु असतांनाच गौरवचा १६ मार्च रोजी पहाटे मृत्यू झाला. तर याच दिवशी रियाचा विज्ञान विषयाचा पेपर होता. घरात लहान भाऊ गौरव याचा मृतदेह असतांनाही मोठं दुःख बाजुला ठेऊन वडिलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी रियाने विज्ञान विषयाचा पेपरही दिला. त्यानंतर दुपारी भावाच्या अंत्यसंस्कारासाठी ती उपस्थित राहिली. आज दहावीचा निकाल असल्याने खंदारे कुटुंबियांकडे गंभीर वातावरण होते.

दुपारी एक वाजता निकाल हाती आला आणि संपूर्ण कुटुंबाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. एकीकडे लहान भाऊ गेल्याचं दुःख असतानाही तिने ८१.२० टक्के गुण मिळविले. यामध्ये नेमका आनंद व्यक्त करावा का आई, वडिलांना सावरायचे हेच रियाला कळेनासे झाले. या प्रसंगातही तिने भावाच्या छायाचित्रासमोर निकालाचा कागद ठेवताच सर्व कुटुंबच ओक्साबोक्सी रडले. त्यांना धिर देण्यासाठी शेजारीही आले. मात्र घरातील प्रसंग पाहून शेजाऱ्यांच्या डोळ्यातही आश्रू आले. आता पुढे वैद्यकिय अभ्यासक्रम पूर्ण करणयाची इच्छा असल्याचे रिया खंदारे हिने सांगितले आहे.



# रेणापूर तालुक्यातील एस.एस.सी बोर्ड परिक्षेत सादीया शेख विद्यालयात प्रथम

**अहमदपूर/प्रतिनिधी**

रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव चिन्मयानंद स्वामी विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी बोर्डाच्या परिक्षेमध्ये दर्जी बोरगाव येथील चिन्मयानंद स्वामी विद्यालयाचा १००% निकाल लागला आहे. विद्यालयातून सादीया शेख या विद्यार्थीनीने ८८.८० टक्के गुण घेवून शाळेतून प्रथम आली आहे. या यशाबद्दल सादीया शेख हिचा शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देवून सत्कार करून कौतूक केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय माने,शाळेचे मुख्याध्यापक सुरेश जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना मुख्याध्यापक जाधव म्हणाले की, सादीया अतिषय हुशार,कमी बोलणारी मुलगी आहे. गावातील सर्व विद्यार्थ्यांना तिच्यापासुन खुप काही शिकण्यासारखे आहे. यावेळी आरुण झाडपिडे, शाम सरवदे, अल्लाबक्श शेख, रवीकिरण क्षिरसागर, बापू गोरे, मुच्चमपल्ले मुकुंद, थाटकर चंद्रकांत, फुलमाळी काशीनाथ शिक्षक व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# प्रतिकूल परस्थितीत उज्वल यश संपादन करणाऱ्या कल्पेश दौडा यांना जिल्हाधिकाऱ्यांनी दिला मदतीचा हात

**पालघर/प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिकूल परस्थिती असताना तसेच दोन्ही हात नसताना बिकट परिस्थितीला आव्हान देत कल्लाले ता. पालघर येथील कल्पेश विलास दौडा या जिगरबाज विध्यार्थ्यांने बारावी मध्ये ६८ टक्के गुण घेऊन उज्वल यश संपादन केले या बाबतची माहिती जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांना मिळताच त्यांनी कल्पेश च्या घरी जाऊन त्याचे कौतुक तर केलेच त्याला पुढील शिक्षणा साठी मदतीचा हात दिला.

जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी कल्पेशच्या घरी अचानक भेट दिल्या मुळे कल्पेशचे आई, वडील तसेच कल्पेश भारावून गेले. जिल्हाधिकारी डॉ. शिंदे हे गरजू व्यक्ती प्रयत्न शासकीय योजना पोहचाव्यात आणि त्यांची प्रगती व्हावी यासाठी प्रयत्नशील असतात. कल्पेशला देखील विस हजाराचा धनादेश दिला तसेच कल्पेशच्या आई, वडील, दोन बहिणी यांना नवीन कपडे, राशन इतर आवश्यक वस्तू त्यांनी भेट दिल्या असुन पुढील शिक्षणाचा खर्च जिल्हाधिकारी कार्यालय, प्रांत कार्यालय आणि तहसील कार्यालया मार्फत करणार असल्याचे



सांगितले तसेच जिल्ह्यातील कोणताही विध्यार्थी परस्थितीमुळे शिक्षणा पासून वंचित राहणार नाही असेही सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी कांबळगाव ता. पालघर येथील कोव्हिड केयर सेंटरला अचानक भेट देऊन तेथील रुग्णाशी संवाद साधला. तुम्हाला औषधं, गोळ्या नियमित मिळतात का? तुम्हाला चांगल्या प्रतीचे जेवण मिळते का? नास्तामध्ये काय देतात. इथे काही अडचण आहे का? असे अनेक प्रश्न विचारून जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी कोव्हिड केयर सेंटरचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी यांनी अचानक भेट दिल्याने रुग्णांना सुखद धक्का बसला. जिल्हाधिकारी डॉ. शिंदे हे जिल्ह्यातील कॉरनटाइन सेंटर, कोव्हीड केयर सेंटर, कोव्हीड हॉस्पिटल येथे अचानक भेट देत असल्याने रुग्णांनी समाधान व्यक्त केले. यावेळी पालघरचे तहसीलदार सुनील शिंदे व इतर अधिकारी उपस्थित होते.

# आक्रोश तडफडून मरणाऱ्या रुग्णांचा!

जनतेवर जेंव्हा एखादे मोठे संकट येते, तेंव्हा त्या संकटकाळात जनतेला सर्व प्रकारची मदत करण्याची जबाबदारी सरकारची असते आणि ही मदत करताना नियमांची किंवा नको त्या शंका कुशंकाचे अडथळे उभे करायचे नसतात. सध्या संपूर्ण जगात कोरोनाचे भयंकर संकट सुरू आहे. पण या संकटाच्या भीतीने कुठल्याही देशातल्या राज्यकर्त्यांनी सलग चार पाच महिने लॉकडाऊन करून तिथल्या जनतेला घरात डांबून ठेवले नाही. सुरवातीच्या काही काळ लॉकडाऊन करून नंतर दोन तीन महिन्यांनी हळूहळू दैनंदिनी जीवन पूर्व पदावर आणले. आज भारत सोडून जगातल्या सर्व देशात लोकं आपला कामधंदा सांभाळून कोरोनाशी संघर्ष करीत आहेत. मग भारतीय आणि खास करून महाराष्ट्रातल्याच राज्यकर्त्यांना कोरोनाची एवढी भीती का वाटते तेच कळत नाही? सरकार कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काम करतेय, नाही असे नाही. पण ते करीत असताना जे काही चुकीचे निर्णय घेतले जात आहेत, जो काही भेदभाव केला जातोय. त्यामुळे लोकांचा संताप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सरकारने तीन महिन्यांनी अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी लोकल ट्रेन सुरु केली. त्यात सरकारी कर्मचारी, वैद्यकीय सेवेतील कर्मचारी यांनाच फक्त लोकलने प्रवास करण्याची मुभा दिलेली आहे. पण वैद्यकीय सेवा ज्या रुग्णांसाठी आहे त्यांना मात्र लोकल मधून प्रवास करण्यास बंदी आहे. त्याचा परिणाम असा होतोय की मुंबई उपनगरे तसेच ठाणे पालघर सारख्या जिल्ह्यातून मुंबईतील सरकारी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणारा रुग्ण गेल्या चार महिन्यांपासून मुंबईला जाता न आल्याने उपचारापासून वंचित आहे. या चार महिन्यांच्या काळात त्याला उपचार न मिळाल्याने त्याचा आजार बळावला आहे, तर काही रुग्ण घरातच तडफडून मेले, हा एक प्रकारे त्या रुग्णांवर अन्याय नाही का? जर तुम्ही वैद्यकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना लोकल प्रवासाची मुभा देताय तर मग ही वैद्यकीय सेवा ज्या रुग्णांसाठी आहे त्यांना प्रवासाची मुभा का नाही? कारण देशात सध्या फक्त कोरोनाचेच रुग्ण आहेत का? इतर कोणत्याही आजाराचे रुग्ण नाहीत का? रेल्वे मंत्र्यांनी रुग्णांना रेल्वेचा प्रवास नाकारल्याने हृदय विकार ,कॅन्सर, किडनी, प्यारालिसेस यासारख्या गंभीर आजाराच्या रुग्णांवर घरातच तडफडून मरण्याची पाळी आलीय. कारण उपनगरांमध्ये किंवा ठाणे पालघर, जिल्हा नवी मुंबई, पनवेल या ठिकाणी जी खाजगी रुग्णालये आहेत त्यांची फी गोरगरीब रुग्णांना परवडणारी नाही. त्यामुळे खाजगी रुग्णालयात ते उपचार घेऊ शकत नाही. त्यातच सलग चार महिने लॉकडाऊन असल्याने नोकरी धंदाही गेल्यात जमा, अशावेळी उपचारासाठी पैसा आणायचा कुठून? सरकारला आणि इथल्या बड्या राजकीय पक्षांना हे दिसत नाही का? मग का नाही या प्रश्नावर हे लोक आवाज उठवत? राजकीय पुढाऱ्यांना जनतेची किती काळजी आहे ते या लॉकडाऊनच्या काळात बघायला मिळाले. एका हृदयरोगी इस्माने रेल्वेच्या पासासाठी एका भाजप नेत्याला दोन वेळा मॅसेज पाठवला, पण त्याने मदत करायचे तर सोडाच त्या हार्ट अ‍ॅटेकच्या पेशंटला उत्तर ही दिले नाही. विषेश म्हणजे हाच भाजपचा नेता सरकारच्या विरोधात बोलायला नेहमी पुढे पुढे असतो. त्या हार्ट अ‍ॅटेक पेशंटने भाजपच्या एका प्रवक्त्याला मदतीसाठी अनेक वेळा फोन केला, पण मदत मिळू शकली नाही. अरे अशा अडचणीच्या काळात जर तुम्ही गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना मदत करू शकणार नाही, तर तुमचा उपयोग काय? माणुसकी काय असते ती कोरोनाच्या संकट काळात लोकांनी खूप जवळून अनुभवली आहे. त्यामुळे आता लोकांना राजकारण्यांची घृणा वाटायला लागली आहे. एकीकडे सरकार चुकीची धोरणे राबवत आहेत, तर दुसरीकडे विरोधी पक्षांकडून सुद्धा लोकांना मदत मिळायला तयार नाही. त्यामुळे लोक हतबल आहेत. अरे इतरांच सोडा किमान गंभीर आजारी लोकांना तरी मदतीचा हात द्या! आज सत्ताधारी असोत की विरोधी सर्वच पक्षाचे लोकं करोडपती आहेत. पण या संकटाच्या काळात लोकांना मदत करण्याची त्यांची दानत नाही. अर्थात सगळेच पक्ष तसे नाहीत. बहुजन विकास आघाडी सारखे छोटे पक्ष या संकट काळात लोकांना अन्न धान्यापासून वैद्यकीय सेवेपर्यंत सर्व प्रकारची मदत करीत आहेत. गंभीर रुग्णांना रेल्वे प्रवास नाकारणाऱ्या रेल्वेच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात याच पक्षाने प्रथम आवाज उठवला. आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पंतप्रधान, रेल्वेमंत्री यांच्यासह ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाही साकडे घालून किमान गंभीर आजारी रुग्णांना तरी लोकल प्रवासाची मुभा द्या अशी विनंती केली आहे. वास्तविक इतर पक्षांनीही आजारी रुग्णांच्या बाजूने आवाज उठवायला हवा होता, पण तेही गप्प बसलेत. त्यामुळे या सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचा लोकांचा विश्वास उडाला आहे. अशा स्थितीत आपला कुणीही वाली नाही अशी भावना या आजारी रुग्णांमध्ये पसरली आहे. त्यामुळे या लोकांच्या वेदना सरकार समजून घेणार आहे की नाही ते एकदा त्यांनी जाहीर करावे, म्हणजे मग तडफडून मरण्यापेक्षा इच्छा मरणाची तरी न्यायालयाकडे परवानगी मागता येईल, जेणेकरून मानसिक आणि शारीरिक व्याधितून कायमची सुटका होईल.

# रिक्षा आणि शिक्षा!



कोरोनाच्या संकट काळातही महाराष्ट्रात जो राजकीय तमाशा सुरू आहे तो पाहून हसावे की रडावे तेच कळत नाही. गेले चार महिने सुरू असलेल्या लॉकडाऊनमुळे लोकं भिकेला लागलेत. नोकरी धंदा गेल्याने पोराबाळांना ठार मारून लोकं आत्महत्या करीत आहेत. पण इथले राजकीय पक्ष आणि त्यांच्या पुढाऱ्यांना जनतेची काही पडलेलीच नाही. कारण सत्ताधारी आपले सरकार वाचवण्यासाठी वेगवेगळ्या कसरती करीत आहेत, तर विरोधी पक्ष सरकार पाडण्यासाठी नव नवे डावपेच आखात आहेत. ज्या राज्याच्या राजकारणाची इतकी भयंकर स्थिती असेल तर त्या राज्याचे काय होणार हे सांगायला ज्योतिषाची आवश्यकता नाही. राज्यात सध्या तीन पक्षांचे महाविकास आघाडी सरकार आहे आणि विरोधी पक्षाच्या मते ही तीन चाकी रिक्षा आहे. पण दुर्दैवाने या तीन चाकी रिक्षाचा ड्रायव्हर कमजोर असल्याने मागच्या सिटवर बसलेले लोकच रिक्षा कुठल्या दिशेने न्यायची हे ठरवत असतात आणि म्हणूनच विरोधकांना ही रिक्षा पलटी करायची आहे. त्यासाठी भाजपवाल्यांनी जोर लावायला सुरुवात केली आहे. एकीकडे सांगायचे की आम्हाला सरकार पाडण्यात इंटरेस्ट नाही आणि दुसरीकडे अजूनही शिवसेनेसोबत सरकार बनवायला आम्ही तयार आहोत असे सांगून सत्तेची स्वप्न बघायची भाजपचा हा धुर्तपणा आता लोकांनाही चांगलाच कळला आहे. सोमवारी राज्य कार्यकारिणीच्या बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबोधित करताना भाजपचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी स्वबळाचा नारा दिला होता. पण स्वबळावर निवडणुका लढण्याइतपत भाजपची महाराष्ट्रात ताकत आणि योग्यता आहे का? अरे सेना भाजपने एकत्र लढूनही दोनशे सोडा पावणेदोनशे जागाही जिंकता आल्या नाहीत, मग स्वबळावर बहुमत कसे मिळवणार? आणि आज राज्यातील जनता कोरोनाच्या विळख्यात असताना सत्तेची समीकरणे मांडायला आणि स्वबळाचा नारे द्यायला या लोकांना लाज कशी वाटत नाही. विरोधी पक्षनेते केवळ महाराष्ट्रातल्या काही भागातली परिस्थिती पाहून आले की त्यांची जबाबदारी संपली का? वास्तविक भाजपा राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत कोरोना आणि लॉकडाऊनमुळे देशोधडीला लागलेल्या लोकांसाठी आपल्याला काय करता येईल यावर चर्चा व्हायला हवी होती. कारण आज संपूर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊनच्या विरोधात लोकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. कारण या लॉकडाऊनमुळे लोकांच्या नोकऱ्या गेल्या, धंदे बंद झाले, लोकल ट्रेन बंद ठेवल्याने आजारी माणसाला के.ई.एम. किंवा जे.जे. सारख्या मुंबईतल्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी जायला मिळत नाही. त्यामुळे कित्येक लोक घरातच तडफडून मेले. त्याच कोणालाच काही नाही. सरकार लॉकडाऊनवर ठाम आहे, तर विरोधी पक्षही लॉकडाऊन उठवण्याबाबत बोलायला तयार नाही. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी तर कोरोनाची एवढी धास्ती घेतलीय की ते घराबाहेर पडायला तयार नाहीत. अशा स्थितीत लोकांची काय अवस्था झाली आहे हे त्यांना कसे कळणार? त्यामुळे या सरकारी रिक्षाने लोकांना मात्र शिक्षा भोगायला लावली आहे. आता विरोधी पक्ष या रिक्षाला कधी पलटी करेल तेंव्हा करेल पण आता लॉकडाऊन मागे घेतला नाही तर लोकच रस्त्यावर उतरून या रिक्षाला आग लावतील. कारण लोकांनी किती सहन करायचे? लोक उपाशी मरत असताना या लोकांना राजकारण सुचतच कसं? तेच कळत नाही. म्हणूनच महा विकास आघाडीला आपली तीन चाकी रिक्षा वाचवायची असेल तर लॉकडाऊन उठवून लोकांना मोकळा श्वास घ्यायला परवानगी द्या! असेही लॉकडाऊन असूनही रोज हजार दीड हजार लोक कोरोना बाधित होताच आहेत. रोज दोन तीनशे लोक मरतच आहेत. पण काम धंदा बंद पडून जर पोटासाठी लोक लूटमार करायला लागले किंवा आत्महत्या करायला लागले, तर ती परिस्थिती कोरोना पेक्षाही भयंकर असेल. मुख्यमंत्री सांगत आहेत की लोकल ट्रेन सुरु केल्यावर जर कोरोना आणखी पसरला तर त्याची जबाबदारी घेणार आहात का? अहो मुख्यमंत्री महोदय अगोदर तुम्ही सांगा की उपासमारीने लोक मेले तर त्याची जबाबदारी तुम्ही घेणार आहात का? लोकांनी धान्याची दुकाने, बँका लुटायला सुरवात केली किंवा तशाच प्रकारची गुन्हेगारी वाढली तर त्याची जबाबदारी तुम्ही घेणार आहात का? विनाकारण लोकांना त्रास देण्याचा का प्रयत्न करतंय. आज तुमच्याकडे भरपूर धन संपत्ती आहे, त्यामुळे तुम्हाला व तुमच्या मुलाबाळांना कसलीच चिंता नाही. पण ज्याच्या घरात आज चूल वीज आहे त्याने किती दिवस उपाशी मरावं याचे उत्तर द्या आणि नंतर जबाबदारी बाबत बोला. या देशातल्या किंवा महाराष्ट्रातल्या राजकीय पक्षांना त्यांची जबाबदारी कळली असती तर आज देशातल्या १३० कोटी जनतेवर कोरोना या संकट काळात उपाशी मरण्याची पाळी आली नसती. तेंव्हा बाकीचं सगळ राजकारण सोडून फक्त आणि फक्त लॉकडाऊन कधी उठवणार आणि लोकांची रोजी रोटी कधी सुरू होणार याबद्दल बोला.

कारण सध्याच्या परिस्थितीत लोकांना राजकारणात कवडीचाही इंटरेस्ट राहिलेला नाही. त्यामुळे निदान अशावेळी तरी राजकीय पुढाऱ्यांनी पाडापाडी आणि फोडा फोडीचे राजकारण करून नये. आज लोकांना ज्या गोष्टीची गरज आहे. त्याकडेच सत्ताधारी आणि विरोधी पक्षाने लक्ष द्यायला हवा. लोकांच्या आज काय भावना आहेत. कोणत्या अडचणी आहेत आणि मुख्य म्हणजे उद्योग धंदे बंद पडल्याने राज्याचा जो महसूल बुडतो आहे त्याचे काय करायचे त्यावर बोलाय. पण अर्थ चक्र सुरू करण्याबाबत बोलायचे झाल्यास लॉकडाऊन उठवावा लागेल आणि लॉकडाऊन पूर्णपणे उठवले तर कोरोनाचा प्रादुर्भाव आणखी वाढेल याची सरकारला भीती वाटत आहे. त्यामुळेच सरकारच्या तीन चाकी रिक्षाला आचके बसत आहेत. अधून मधून स्टिअरिंग जाम व्हायला लागले आहे, पण हे असेच चालू राहिले तर राज्यातली परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर जाईल आणि पुढे काय होईल हे सांगता येणार नाही. त्यामुळे आता फारकाळ कोरोनाची भीती बाळगून चालणार नाही.

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

# सावध राहा!! ऑनलाईन व्यवहार वाढले, सायबर धोका ही वाढला...!

**दिशायन**

नोटबंदीनंतर ऑनलाईन व्यवहारांना तेजी मिळाली होती. त्यानंतर या लॉकडाऊनमुळे पुन्हा एकदा ऑनलाईन व्यवहाराचे महत्त्व अधोरेखित झाले. शालेय शिक्षणापासून ते वृद्धापकाळातील पेन्शन घेण्यापर्यंत सर्व काही आपण ऑनलाईन करत आहोत. आपण ई-व्यवहारांना आपल्या आणि इतरांच्या सोयीसाठी स्वीकारले आहे. या व्यवहारांच्या सुरक्षेत वाढ होत असली तरी फसवणूक करणारे सायबर गुन्हेगार काही शांत बसत नाहीत. टाळेबंदीत ई-व्यवहार वाढले तसे सायबर गुन्हेगारांचे गुन्हेही वाढले. टाळेबंदीत रेल्वे गाड्यांत, रेल्वे स्थानके, बस स्थानके, बाजार इत्यादी ठिकाणी होणाऱ्या गुन्हेगारीचे प्रमाण घटल्याचे सांगण्यात आले.



त्यावेळी सायबर गुन्हेगारी वाढत होती. २५ जुलैपर्यंत राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यात तब्बल ५६० सायबर गुन्ह्यांची नोंद झाली, तर २९० आरोपींना अटक करण्यात आले. बीड, कोल्हापूर, जालना इत्यादी जिल्हे सायबर गुन्ह्यांमध्ये अव्वल आहेत. सायबर गुन्हेगारी करण्यामध्ये जगात चीन अव्वल आहे. तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील एकूण सायबर गुन्ह्यांपैकी ४१ टक्के गुन्हेगारी चीममधून होते. अमेरिकेतून १० टक्के गुन्हे होतात. यात भारत आठव्या स्थानावर आहे. २.३ टक्के गुन्हे भारतात होतात, असे सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीजच्या अद्ययावत अहवालात म्हटले आहे. पण जगातील सायबर गुन्हेगारीला भारतीयच सर्वाधिक बळी पडलेत. एकूण ८० टक्के भारतीयांची ऑनलाईन फसवणूक झाली असल्याचे जर्मन रिसर्च कंपनी स्टॅटेस्टीकाने सादर केलेल्या आकेवारीत नमूद केले आहे. ऑनलाईन फसवणूक करण्याच्या पध्दतीला 'फिशिंग' म्हणतात. गळाला खाद्य लावून तो गळ तलावात सोडला की हजारो माशांपैकी केवळ एक मासा गळाला लागतो. तसेच ऑनलाईन फसवणूक करणारे भामटे अशाच पध्दतीने गळ लावून शेकडो लोकांना आमिषे दाखवतात, त्यापैकी एखादी व्यक्ती अडकते म्हणूनच या प्रकारालाही फिशिंग म्हणतात. जाळ्यात ओढण्यासाठी लॉटरी, लकी ड्रॉ, स्पर्धेत नाव आले, गिफ्ट मिळाले अशी आमिषे दाखवली जातात.

### सायबर गुन्ह्यांचे प्रकार

- भविष्यात नवनवीन सायबर गुन्हे घडतील. तुमच्या पेटीएमचे, बँक खात्याचे केवायसी अपडेट करायचे आहे, डेबीट कार्ड पडताळणी (व्हेरिफिकेसन) करायचे आहे, तुमच्या पॉलीसी अपडेट करायची आहे अशी वेगवेगळी कारणे सांगून फोनवरून बोलण्यात गुंतवून माहिती काढली जाते. त्या व्यक्तीने आपले नाव, पत्ता, बँकांचे तपशील, कार्डाचे तपशिल अचूक सांगितल्याने आपला चटकन विश्वास बसतो आणि फसतो. खरेतर माहिती काढणे अत्यंत सोप्पे असते. २४ तास हॅकर्स आणि सायबर भामटे हेच काम करत असतात.
- सायबर भामटे आता अश्लील संकेतस्थळाचा आधार घेऊ लागले आहेत. अश्लील संकेसस्थळ बघत असताना हे ठरपीुरीश व्हायरस सोडून संगणक, मोबाईलमधील डेटा हॅक केला जातो. तसेच अश्लील संकेतस्थळ बघणाऱ्यांना ब्लॅकमेल करून खंडणी उकळण्यात येते. अश्लील संकेतस्थळे पाहण्याचे प्रमाण अधिक आहे. याचाच गैरफायदा आता हॅकर्स आणि सायबर भामटे घेत आहेत.
- फेसबुकवर जर तुमच्या मित्रांचे, परिचितांचे दुसरे अकाऊंट दिसले तर सावध रहा. हे दुसरे अकाऊट हॅकर्स कडून बनवलेले असू शकते. एखादी व्यक्ती आधीच आपल्या मित्र यादीत असते. परंतु त्याने दुसरे खाते उघडले असेल असे वाटून आपण त्यांना रिक्वेस्ट पाठवतो. मात्र ज्या व्यक्तीच्या नावाचे हे खाते असते त्याला देखील याची कल्पना नसते. मग हॅकर्स अकाऊंवरच्या मित्र-मंडळींना मदत हवी म्हणून पैसे मागतात, मुलींचे यौनशोषण करतात, प्रलोभने दाखवतात, ब्लॅकमेल करतात.
- बरेच लोक अनधिकृत संकेतस्थळावरून मोफत सिनेमे मिळवतात. मोफत सिनेमे आणि वेबसिरीजच्या लिंकद्वारे सायबर भामटे व्हायरस आपल्या मोबाईल, संगणकात सोडतात. त्याद्वारे संबंधित व्यक्तीच्या मोबाईल तसेच लॅपटॉप मधली माहिती चोरली जाते आणि नंतर त्या व्यक्तीला ब्लॅकमेल केले जाते. १० धोकादायक वेबसिरीज आणि सिनेमांची लिंक महाराष्ट्र सायबर सेलने प्रसिध्द केली आहे. यात दिल्ली क्राईम, ब्रूकल्यान नाईन नाईन, पंचायत, अकोरी, फाऊदा, माईंडहंटर, नार्कोस, देवलोक, लॉस्ट इत्यादी वेबसिरीज. तर मर्दानी- २, झूटोपिया, जवानी जानेमन, छपाक, लव्ह आज कल, इन्सेप्शन, बाहुबली, रजनिगंधा, गली, बाला इत्यदी सिनेमे. हे अधिकृत अ‍ॅपद्वारे पाहण्यात कोणताही धोका नाही.
- अ‍ॅण्ड्रॉईड फोनमध्ये मालवेअर सोडून फोनमधला डेटा हॅक करतो. फोन मधला डेटा तर चोरीला जातोच याशिवाय फोनमध्ये काय टाईप केले जाते हेदेखील सायबर भामट्यांना समजते. वेगवेगळ्या विनामूल्य अ‍ॅप्स मधून हा मालवेअर अ‍ॅण्ड्रॉईड फोन मध्ये प्रवेश करतो आणि आपले कार्य करतो. यासाठी गुगल प्ले स्टोरमधूनच अ‍ॅप डाऊनलोड करावेत, कुठल्याही मोबाईल बँकींग आणि इतर अ‍ॅप मध्ये ऑटोलॉगिन करू नये.
- नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट संकेतस्थळ बनवतात. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या माध्यमातून बनावट संकेतस्थळ गुगल सर्चमध्ये सर्वात वर आणले जाते. लोक त्या बनावट संकेतस्थळ खरे समजून त्या कंपनीशी आर्थिक व्यवहार करतात. मुंबईत सध्या अनेक नामांकित कंपन्यांच्या नावाने फसवणूक झाल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या आहेत.
- आता ई-सिम कार्डमुळे मोबाईल हॅण्डसेटमध्येच सीम कार्ड असते. आपल्याला ज्या सर्व्हिस प्रोव्हाडयरची सेवा हवी आहे ती घेतल्यानंतर इनबिल्ड सिमकार्ड कार्यरत होते. सायबर भामटे १२१ या नंबर आणि मोबाईल सर्व्हिस प्रोव्हायडरकडे स्वत:चा ईमेल आयडी ग्राहकांच्या नावाने अपडेट करतात आणि सदर ग्राहकाच्या नावे ई सीम कार्ड सुरू करून क्यू आर कोडद्वारे अ‍ॅक्टीव्हेट करतात. मग ग्राहकाला एक लघुसंदेश येतो. त्यावर एक लिंक असते. ती ओपन केल्यास ग्राहकाची सर्व माहिती बँक खात्याचा नंबर, डेबीट कार्ड नंबर सर्व विचारले जातात. सायबर भामटे मग त्यांच्या फोनमध्ये तुमच्या नावाचे ई सीम कार्ड वापरून तुमच्या सर्व बँक खात्याची रक्कम ट्रान्सफर करून घेतात.
- आपल्या फोनला पासवर्ड असला तरी तो सुरक्षितच असतो, अशा भ्रमात असता कामा नये. पासवर्ड डिटेक्टर सर्व नंबर, शब्द, चिन्हे टाकून आपोआप डिटेक्ट करत असतो. त्यामुळे सायबर भामट्यांना पासवर्ड क्रॅक करणे फारसे कठीण राहिलेले नाही.
- आधुनिक काळात आपली कुंडली अर्थात आपली खाजगी आणि व्यावसायिक माहिती ही आपल्या मोबाईल आणि संगणकात असते. ती चोरून बक्कळ पैसा कमवता येतो. त्यामुळे हॅकर्स डेटा चोरी करण्याला प्राधान्य देतात. हे हॅकर्स एवढे सक्रीय असतात की दिवस-रात्र त्यांचे काम चालू असते. मोठमोठ्या कंपन्या प्रतिस्पर्धी कंपन्यांची माहिती चोरण्यासाठी हॅकर्सची नियुक्ती करतात. या डेटाचा मग व्यावसायिक कामासाठी उपयोग केला जातो, असे सायबर सेलचे पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी सांगितले.
- मुली प्रियकरांना आपली अश्लील छायाचित्रे पाठवतात. पुढे प्रियकरासोबत बिनसल्यावर तो ही छायाचित्रे व्हायरल करतो. याशिवाय स्वत:साठी मोबाईलमध्ये स्वत:ची अनावृत्त अवस्थेतील छायाचित्रे काढली जातात. मोबाईल विकल्यावर, चोरी झाल्यावर हीच छायाचित्रे मिळवून त्याचा गैरवापर केला जातो. कारण मोबाईल किंवा संगणाकातून छायाचित्रे डिलीट जरी केली तरी ती विविध सॉफ्टवेअरमधून पुन्हा मिळवतात.
- 'बॅकस्टेज' नावाचा नवीन प्रकार आल्याची माहिती ब्लू स्पाय आएएनसी या सायबर सिक्युरिटी कंपनीचे संचालक तुषार विश्वकर्मा यांनी सांगितली. व्हॉटसअ‍ॅपच्या अनेक ग्रुपवर असतो. ग्रुपमध्ये एखादा फोटो फॉरवर्ड केला जातो. उत्सुकतेपोटी तो क्लिक केल्यावर ओपन होत नाही. नेटवर्क इश्यू असे वाटून दोन तीन वेळा आपण तो क्लिक करतो. पण याच २-३ क्लिकमध्ये फोटोच्या मागे दडलेले मालवेअर काम करतात आणि तुमच्या मोबाईल मध्ये शिरतात.

सायबर भामटे, हॅकर्स या पुढील काळात अधिक सक्रीय होत राहणार आहे. म्हणून याला घाबरून ऑनलाईन व्यवहार, स्मार्ट फोन वापरणे बंद होऊ शकत नाही. आपली नेहमीची कामे खोळंबतील आणि प्रगती थांबेल. त्यामुळे सावधगिरी बाळगणे हेच आपल्या हाती आहे. सातत्याने मोबाईल, लॅपटॉप मध्ये अधिकृत अ‍ॅण्टीव्हायरस टाकणे, तो अपडेट करणे, अनोळखी लिंक ओपन न करणे, अनधिकृत साईटचा वापर न करणे, सामाजिक माध्यमावरील अकाऊंटचे पासवर्ड ६ महिन्यांनी बदलणे तसेच संवेदनशील माहिती संगणकात न ठेवणे असा सल्ला सायबर तज्ज्ञ प्रशांत माळी यांनी दिला.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# कोविड रुग्णाकडून डिपॉझिट मागणाऱ्या खाजगी, रुग्णालयावर कारवाई करावी - अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी**

कोविड-१९ चा प्रादुर्भाव प्रतिबंधित करण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यात चेस दी व्हायरस ही मोहीम अत्यंत प्रभावीपणे राबवून मिशन झिरो ची यशस्वीपणे अंमलबजावणी करावी तसेच खाजगी रुग्णालयांना कोविड रुग्णसेवा सरु करून उपचार करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु काही खाजगी रुग्णालयाकडून कोविड रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्यांच्याकडून डिपॉझिट मागितले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. अशा रुग्णांकडून डिपॉझिट घेण्याची आवश्यकता नाही. यापुढील काळात कोणत्याही खाजगी रुग्णालयांनी कोविड रुग्णांकडून डिपॉझिट मागितले तर अशा रुग्णालयावर कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री देशमुख यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित लातूर जिल्हा कोविड-१९ च्या अनुषंगाने आढावा बैठकीत पालकमंत्री देशमुख बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जी.श्रीकांत, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल पोलीस अधीक्षक राजेंद्र माने, महापालिका आयुक्त देविदास टेकाळे, अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक हिंमत जाधव, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेचे अधिष्ठाता डॉ. मोहन डोईबोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय ढगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, विभाग प्रमुख, सर्व तहसीलदार व गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री देशमुख पुढे म्हणाले की, जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेला कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाने चेस दी व्हायरस अंतर्गत मोठ्या प्रमाणावर तपासण्या कराव्यात व माननीय मुख्यमंत्री महोदय यांचे मिशन झिरो ही संकल्पना जिल्ह्यात यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी ताप, सर्दी व खोकला हे लक्षणे जाणवताच तात्काळ तपासणी करून घ्यावी. त्याप्रमाणेच जिल्ह्यातील बारा खाजगी रुग्णालय हे महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट आहेत. तरी या सर्व खाजगी रुग्णालया

मध्ये कोविड रुग्णावर उपचार सुरू झाले पाहिजेत व या रुग्णालयातील ८० टक्के बेड्स कोविड रुग्णांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री देशमुख यांनी दिले. तसेच खाजगी डॉक्टर वर हल्ला करणाऱ्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई प्रस्तावित करावी असे निर्देश त्यांनी दिले. सर्व शासकीय रुग्णालये व खाजगी रुग्णालयातील सर्व बेड्स ऑक्सिजन नेट झाले पाहिजेत. त्या करिता प्रशासन व खाजगी रुग्णालयांनी तात्काळ अंमलबजावणी करावी अशी सूचना पालकमंत्री देशमुख यांनी केली. त्याप्रमाणेच उपरोक्त सर्व रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या बेड ची माहिती डॅशबोर्ड च्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावी व खाजगी रुग्णालयात बेड उपलब्ध होत नाहीत याबाबत तक्रारी येणार नाहीत याविषयी दक्षता घ्यावी. कोरोना च्या उपाय योजना राबविण्यासाठी महापालिकेला मनुष्यबळाची कमतरता भासत असल्याने जिल्हा प्रशासनाने आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, असेही त्यांनी सूचित केले. जिल्ह्यात रोज जे कोरोना बाधित रुग्ण आढळून येत आहे त्या



रुग्णांना उपचारासाठी कोणत्या ठिकाणी पाठविण्यात येणार आहे याची माहिती त्याच ठिकाणी त्यांना मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे संबंधित बाधित असलेला रुग्ण इतरत्र फिरणार नाही व त्याच्यावर तात्काळ उपचार सुरू करणे सोयीचे होईल. स्वर्गीय पत्रकार गंगाधर सोमवंशी यांची कोरोना टेस्ट कोणत्या ठिकाणी झाली व त्यांच्यावर उपचार प्रथम कुठे झाले याबाबतची माहिती पालकमंत्री देशमुख यांनी घेऊन त्यांच्या कुटुंबियांना विमा संरक्षण उपलब्धतेबाबत प्रशासनाने माहिती घ्यावी, अशी सूचना त्यांनी केली.जिल्हाधिकारी जी.श्रीकांत यांनी कोरोना प्रतिबंधासाठी जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच प्रशासनाला पाच हजार रॅपिड टेस्ट किट्स उपलब्ध झालेल्या होत्या त्याद्वारे रॅपिड टेस्टिंग सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पुढील दोन-तीन दिवसात २० हजार रॅपिड टेस्ट किट उपलब्ध होणार असून या सर्व किट्स महापालिका, सर्व नगरपालिका व तालुका स्तरावरील यंत्रणेला देण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील काळात अधिक गतीने जास्तीत जास्त नागरिकांची कोरोना तपासणी करणे शक्य होणार आहे. तसेच प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर बेड्स उपलब्ध करून ठेवलेले आहेत अशी माहिती त्यांनी दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनीही लातूर शहर व जिल्ह्यातील विविध कोविड केअर सेंटर व डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल यांना भेट देऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रारंभी जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर संजय ढगे यांनी आरोग्य यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दीचा निधीचा उपयोग मातंग समाजातील गरीब जनतेसाठी करा -सुधारक भालेराव

**उदगीर/करकरे अंबादास**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात १०० कोटी रुपयांची तरतूद केली होती. ज्यामुळे वर्षभर अनेक कार्यक्रम राबविण्यात यावे त्यामध्ये जयंती उत्सव, सामाजिक, सांस्कृतिक व वेगळा आदर्श समाजात निर्माण व्हावा असा उद्देश होता. मात्र




निवडणूका, कोरोना यामुळे जयंती महोत्सवावर याचा परिणाम झाला असुन १०० कोटी मधील शिल्लक निधीचा उपयोग समाजाच्या हितासाठी सरकारने या निधीचा उपयोग करावा अशी मागणी माजी आ. तथा भाजप अनुसूचित जाती प्रदेशाध्यक्ष माजी आमदार सुधाकर भालेराव यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. कोरोनाच्या महामारी मुळे उत्सव व सन साजरे होवू शकले नाहीत. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यामुळे हे शतकमहोत्सव साजरा करण्यासाठी मागच्या सरकारने १०० कोटी रुपयांची तरतूद करून अनेक उपक्रम हाती घेतले होते. पण निवडणुकीची आचारसंहिता व त्या पाठोपाठ कोरोना महामारी आल्याने १०० कोटी मधील बराचसा निधी अखर्चीक आहे. या शिल्लक निधीचा समाजासाठी उपयोगात यावा यासाठी सरकारने सदर निधीचा उपयोग मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी नवी मुंबई, सिडको विभागामध्ये १० एकर जमीनवर शैक्षणिक स्पर्धा परिक्षा केंद्र, कौशल्यविकास प्रशिक्षण केंद्र, साहित्याचे जतन करण्यासाठी भव्य ग्रंथालय, सांस्कृतिक सभागृह आदी समाजपयोगी स्मारकाची निर्मिती करावी अशी मागणी माजी आ. सुधारक भालेराव यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना निवेदना द्वारे केली आहे.

## चाणक्य अ‍ॅकेडमीचे विद्यार्थी विज्ञान शाखेत तालुक्यात प्रथम तर १२वीच्या परीक्षेत सुद्धा यशाला गवसणी

**वाडा/प्रतिनिधी**

नुकत्याच लागलेल्या १० वी व १२वी च्या निकालात वाडा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याचा अचूक वेध घेणारी नामांकित शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिक असणाऱ्या चाणक्य अर्क्डमी या संस्थेने आपली मोहोर उमटवली आहे. अर्क्डमीत शिक्षण घेणाऱ्या जयदीप पाटील व रोहित पाटील यांनी विज्ञान शाखेत ८९.३८% असे समान गुण मिळून वाडा तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. सुरुवातीला अगदी दहा विद्यार्थी घेऊन सुरू झालेल्या या क्लासचे आज मितिला ७०० विद्यार्थ्यांच्या वटवृक्षात रूपांतर झाले असून तालुक्यातील पालक व विद्यार्थी यांचा विश्वास संपादन करण्यात संस्थेचे संचालक यशस्वी झाले आहेत चाणक्य अ‍ॅकेडमीमुळे अतिशय हुशार परंतु आर्थिक परिस्थीतीने कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेकदा शाळे व्यतिरिक्त ज्यादा



मार्गदर्शन मिळणे शक्य झाले आहे. स्वस्तात व अनेकदा अतिशय गरजू विद्यार्थ्यांकडून नाममात्र फी घेऊन चाणक्य अ‍ॅकेडमी अतिशय दर्जेदार शिक्षण देत अनेक विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे मोलाचे कार्य करत आहे. बारावीच्या निकालात या क्लासेसने दिलेल्या दर्जेदार शिक्षणामुळे जयदीप पाटील व रोहित पाटील यांनी विज्ञान शाखेत ८९.३८ टक्के समान गुण तर सिद्धांत गंधे याने ८६.७६ टक्के, संचित जाधव ८६.३० टक्के, भक्ती गोताराने ८२ टक्के आणि जिज्ञा पाटील हिने ८०.१५ टक्के इतके गुण मिळविले आहेत.

## किल्लारी पोलीसांची धडक कारवाही अवैधरित्या दारु विकणाऱ्या महिलेस अटक

**औसा** : किल्लारी पोलीस ठाणे अंतर्गत गांजनखेडा शिवारात महिला नामे राजाबाई रमेश रामपुरे रा.मंगरुळ ही महिला चोरटी दारु विक्री व्यवसाय करत असल्याची माहिती मिळाली वरुन किल्लारी पोलीसांनी धाड टाकुन शेतातील पत्राचे शेड मधुन देशी दारु ढोकी संत्राचे १६ बॉक्स किमंत ६१ हजार रुपयेचा माल जप्त करण्यात आली. सदरची कारवाई औसा उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली, किल्लारी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी विनोद मेत्रेवार यांचे देखरेखी खालील पथकाने केली. सदर पथकात पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे, पोहेका अनिल शिंदे, पोहेका गणेश यादव, पोना धनराज कांबळे, सैलानी रोजेवाले, स्वप्नील पाटील यांचा समावेश होता.

## शेतकरी हिताचे आंदोलन दडपणाऱ्या, पालकमंत्र्यांना फिरू देणार नाही -गुरूनाथ मगे

**लातूर/प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारने सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे घोषणाबाजी केली होती. मात्र अद्यापही या कर्जमाफीचा लाभ जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांना प्राप्त झालेला नाही. केवळ घोषणाबाजी करण्यात मग्न असलेल्या महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी आता दडपशाही करण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी भाजपाच्या वतीने जे दूध आंदोलन करण्यात आले होते तेही पालकमंत्र्यांनी पोलिस प्रशासनाच्या साह्याने दडपवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र हा प्रयत्न आम्ही हाणून पाडलेला असून आगामी काळात आंदोलन दडपणाऱ्या पालकमंत्र्यांना फिरू देणार नाही, असा इशारा भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे यांनी दिला आहे.

जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा महाराष्ट्रात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे अडचणीत सापडलेला आहे. या अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा याकरीता शहर जिल्हा भाजपाच्यावतीने शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे यांच्या नेतृत्वाखाली बाभळगाव येथील दुधसंकलन केंद्राच्या परिसरात दूध आंदोलन करून रास्ता रोको करण्यात



येणार होता. मात्र पालकमंत्र्यांनी पोलिस प्रशासनाच्या सहकाऱ्याने हे आंदोलन हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बाभळगाव नाका येथे शहर जिल्हा भाजपाने रास्ता रोको केला.

यावेळी अध्यक्ष गुरुनाथ मगे यांनी महाविकास आघाडी सरकारच्या भोंगळ कारभाराचा समाचार घेत सर्वच आघाड्यांवर हे सरकार अपयशी ठरले असल्याचे सांगितले. विशेषतः सत्तेत आल्यानंतर शेतकर्याचा सातबारा कोरा करू अशी घोषणा करणाऱ्या महाविकास आघाडी सरकारचे खरे रूप आता समोर आले आहे. शेतकर्यांना आणखी अडचणीत आणत कमी दराने दूध खरेदी केली जात आहे. दूध उत्पादक शेतकर्यांना न्याय मिळावा याकरीता सरसकट प्रतिलिटर १० रुपये अनुदान मिळावे, दूध भुक्टी निर्यातीला प्रतिकिलो ५० रुपये अनुदान द्यावे आणि गायीच्या दुधाची खरेदी प्रतिलिटर ३० रुपये लिटर दराने करावी या प्रमुख मागण्या सरकारकडे केल्या होत्या. मात्र अद्यापही याबाबत सरकारकडून कोणताच निर्णय न झाल्याने हे आंदोलन करण्यात येत आहे. रितसर व कायदेशीर मार्गाने आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार असतानाही, पालकमंत्र्यांनी प्रशासनाला हाताशी धरून हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे. पालकमंत्र्यांची ही दडपशाही आगामी काळात खपवून घेतली जाणार नाही आणि दडपशाही केल्यास त्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे यांनी यावेळी दिला. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनीही भूमिका मांडली. या आंदोलनात युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, सरचिटणीस शिरीष कुलकर्णी, प्रविण सावंत, नगरसेवक मंगेश बिराजदार, विशाल जाधव, प्रविण अंबुलगेकर, उपाध्यक्ष महेश कौळखरे, चिटणीस ॲड. दिग्विजय काथवटे, मंडल अध्यक्ष ज्योतीराम चिवडे, रवि सुडे, प्रवीण घोरपडे, गणेश गवारे, संजय गीर, नरेश पंड्या, शेख समीना, पार्वती सोमवंशी, प्रेरणा होनराव, गोरोबा गाडेकर, ओबीसी सेलचे देवा गडदे, अनुसूचित सेलचे विजय आवचारे, उद्योग सेलचे विकास देशपांडे, आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## दहावीच्या निकालात रियल कॅडमीचा दबदबा कायम रियल संस्था सामाजिक कार्यातही अग्रेसर

**वाडा/प्रतिनिधी**

बुधवारी जाहीर झालेल्या दहावीच्या निकालामध्ये वाडा तालुक्यात रियल कॅडमी संस्थेचा दबदबा कायम राहिला असून संस्थेच्या खाजगी शैक्षणिक मार्गदर्शन केंद्राची मानसी दिगंबर पाटील ही विद्यार्थीनी ९७ % गुण मिळवून अव्वल ठरली आहे. ही विद्यार्थीनी वाड्यातील पी.जे. हायस्कूलमधील असून सेमी इंग्रजी माध्यमातील आहे. तर शर्वरी सचिन पाटील या विद्यार्थीनीला ९६.६० % मिळाले असून ती लिटिल एंजल हायस्कुलची इंग्रजी माध्यमातील आहे. तसेच ईशा सुनील बाविस्कर ९६.४०% (लिटिल एन्जल्स्), दिशा रविंद्र पाटील ९५.४०% ( लिटिल एन्जल्स्), गौरी कांतीलाल पष्टे ९५.२०% (पी.जे. हायस्कूल), सृष्टी उमेश पटारे ९५.२०% (पी.जे. हायस्कूल), कुणाल सुभाष विसावे ९५.००% (पी.जे. हायस्कूल), सई संजय भोपतराव ९५.००% (पी. जे. हायस्कूल), हे ८ विद्यार्थी ९५% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत तर २२ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

रियल संस्थेचे विशाल ठाकरे व शशांक ठाकरे यांनी सुरू केलेला रियल कॅडमी हे ग्रामीण भागातील पहिले प्रोफेशनल शैक्षणिक मार्गदर्शन केंद्र असून गेली १४ वर्षे वाडा येथे कार्यरत आहे. उत्तम व्यवस्थापन व तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे रियल कॅडमी ग्रामीण भागातील सर्वात जास्त टॉपर्स देणारी संस्था ठरली आहे. आतापर्यत ११७ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. वाडा येथे




असणाऱ्या रियल कॅडमी क्लासेस दिल्या जाणाऱ्या दर्जेदार शिक्षणामुळे तर प्रसिद्ध आहेच परंतु त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून तालुक्यात विविध उपक्रम राबविते . रियल कॅडमीच्या माध्यमातून अनेक गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक मार्गदर्शन दिले जाते तर त्यांच्या पुढील शिक्षणासाठी साहाय्य व मार्गदर्शनही केले जाते. याच बरोबर रियल संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन, विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले जाते. दरवर्षी गुणवंत विद्यार्थी व विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान रियलच्या वतीने केला जातो. फक्त रियलमधील नव्हे तर तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व सामाजिक उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, यासाठी रियलच्या वतीने तालुक्यातील शाळांमध्येही विविध उपक्रम आयोजित केले जातात. तर कोरोना काळात व महापुरासारख्या संकटात रियल संस्थेने गरजूंना मोलाची मदत केली आहे. या वर्षी कोरोना काळात ग्रामीण भागात ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग अवलंबून रियल कॅडमीने आपला ज्ञानयज्ञ सुरूच ठेवला असून रियल कॅडमीतील विद्यार्थ्यांनी यावर्षीच्या निकालात मिळवलेले दैदिप्यमान यश यामुळे रियलच्या मुकुटात मानाचा तुरा खोवला गेला आहे. फक्त रियल कॅडमीच्याच नव्हे तर ग्रामीण भागातील सर्वच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून तसे उपक्रम आम्ही नेहमीच राबवत असतो आणि यापुढेही राबवत राहू. पालकांचा विश्वास, विद्यार्थ्यांची मेहनत आणि अनेक शुभचिंतकांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाल्याची भावना शशांक ठाकरे आणि विशाल ठाकरे यांनी व्यक्त केली.

## कोविड-१९ साथ रोग नियंत्रणासाटी मनुष्यबळ, साधनसामुग्री आणि आयईसी उपलब्ध करुन देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रामध्ये कोविड-१९ची रूग्णसंख्या वाढत असून आरोग्य विभागाकडील मनुष्यबळ, साधनसामुग्री अपुरी पडत असल्याने नगरपरिषद व नगरपंचायतीमार्फत वाढीव तांत्रिक मनुष्यबळ, शिघ्र प्रतिसाद पथक, सर्वेक्षण करण्याकरिता मनुष्यबळ, तसेच शहरातील नागरीकांकरीता ॲन्टीजेन टेस्ट किट उपलब्ध करणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद पालघर, मुख्याधिकारी, डहाणू व जव्हार, नगरपंचायत तलासरी, विक्रमगड, मोखाडा, वाडा यांना निर्देश दिले आहेत.

यामध्ये नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रातील वाढत्या कोविड रूग्णांचा सुरूवातीच्या टप्प्यातच शोध घेऊन उपचार करण्याकरीता फिवर क्लिनिक



सुरू करणे याकरीता वैद्यकीय अधिकारी व त्यांना लागणारा तांत्रिक कर्मचारी वर्ग भरती करणे याकरीता तालुका आरोग्य अधिकारी यांना आवश्यक असलेले मानधन नगरपरिषद व नगरपंचायतकडून वर्ग करण्यात यावे. या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता आवश्यकतेनुसार एका स्वतंत्र वाहनाची व्यवस्था नगरपरिषद व नगरपंचायतीने करून द्यावी. नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना अँटीजन टेस्ट करण्याकरीता तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मागणीप्रमाणे अँटीजन टेस्ट किट करीता आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.

नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीतील सर्व कुटुंबांचा सर्वे नगरपरिषद व नगरपंचायत स्तरावर करण्यात यावा. याकरीता आवश्यक ते मुनष्यबळ नगरपरिषद व नगरपंचायतीने उपलब्ध करून द्यावे व आरोग्य विभागातील कर्मचारी यांचे मदतीने सर्वेक्षणाचे काम करावे. अशा प्रकारच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी दिल्या आहेत. तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांना मध्यवर्ती नियंत्रण कक्षाकरीता डाटा एंट्री ऑपरेटर उपलब्ध करून द्यावा. आरोग्य सेविका तसेच नगरपरिषद व नगरपंचायत



क्षेत्रात सर्वेक्षण करणारे कर्मचारी यांना आवश्यकते प्रमाणे थर्मल मशिन, पल्स ऑक्सीमीटर, मास्क, सॅनिटायझर, हॅन्ड ग्लोज इ. साधनांचा पुरवठा करण्यात यावा. जनजागृतीकरीता बॅनर, पोस्टर, लाऊडस्पिकरद्वारे जाहीर आवाहन याप्रकारचे खएउ प्रकल्प सतत राबविण्यात येणार आहे. नगरपरिषद व नगरपंचायतीस उपरोक्त बाबीकरीता निधीची कमतरता असल्यास १४ व्या वित्त आयोग योजनेतून मंजूरीकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी दिल्या.

## ग्रामस्थांना वर्षभर मोफत दळण आणि मिरची कांडपद्वारे मिरची वाटुन मिळेल!



**लातूर** : गंगापुर ग्रामपंचायतीचा एक रक्कमी १०० टक्के कर भरणाऱ्या ग्रामस्थांना वर्षभर मोफत दळण देण्याचा व मिरची कांडप द्वारा मिरची वाटुन देण्याचा निर्णय गंगापुर ग्रामपंचायतीने घेतला आहे. १०० टक्के कर भरणा करणाऱ्या करदात्यास वर्षभर दळण व मिरची कांडप द्वारा मिरची वाटुन देणारी गंगापुर ग्रामपंचायत ही लातुर जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत आहे. गंगापुर ग्रामपंचायतचा हा उपक्रम पथदर्शी ठरावा तसेच या उपक्रमाचा लाभ कर भरुन सर्व ग्रामस्थांनी घ्यावा असे आवाहन गंगापुर ग्रामपंचायतचे सरपंच बाबु खंदाडे यांनी केले आहे.

03 TO 09 AUGUST 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 01/08/2020 7:40 PM Page 1



# कल्याणमध्ये गुन्हेगारी वर्चस्व तथा आर्थिक वादातून कुख्यात गुंडाची हत्या

**डोंबिवली/प्रतिनिधी**

गुन्हेगारी क्षेत्रात वर्चस्व तसेच आर्थिक वादातून कुख्यात गुंड मुनिया उर्फ जिग्नेश ठक्कर याला दोघा शूटरांनी गोळीबार करून ठार केल्याची घटना कल्याण रेल्वे स्थानकासमोर असलेल्या नीलम गेस्ट हाऊसच्या गल्लीत शुक्रवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास घडल्यानंतर या परिसरात तणावाचे वातावर पसरले आहे. पोलिसांची ५ पथके हल्लेखोरांना शोधण्यासाठी रवाना झाली आहेत.

याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलिसांनी कल्याणच्या अन्सारी चौकातील मदारछल्लामध्ये राहणाऱ्या अधुशहमा शब्बीर अन्सारी (३७) याच्या जबनीवरून फरार चौघांच्या विरोधात भादंवि कलम ३०२, ५०६ (२), ३४ सह भारतीय हत्यार कायदा ३, २५ महाराष्ट्र पोलिस कायदा ३७ (१), १३५ अनव्ये गुन्हा दाखल केला. धर्मेश उर्फ नन्नु नितिन शहा, त्याचा ड्रायव्हर जयपाल उर्फ जापान आणि दोन अनोखळी साथीदार अशी हल्लेखोरांची नावे आहेत. यातील तक्रारदार अधुशहमा शब्बीर अन्सारी हा २०११ पासून जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो. तर जिग्नेश याचे कल्याण येथे किड्स वर्ल्ड नावाचे कपड्याचे दुकान, भिवंडी येथे मेडिकल स्टोअर्स, तसेच पालघर जिल्ह्यातील वाडा येथे स्टोन क्रशरचा व्यवसाय आहे. तर धर्मेश उर्फ नन्नू शहा आणि जिग्नेश ठक्कर हे बालपणीचे मित्र असून या दोघांमध्ये सद्या आर्थिक व्यवहार तसेच गुन्हेगारी वर्चस्वावरून आपसात वाद सुरू झाले. तीनच दिवसांपूर्वी गुरुवारी रात्री सव्वा अकराच्या सुमारास शंकरराव चौकात गँगस्टर धर्मेश उर्फ नन्नू शहाचा साथीदार चेतन पटेल आणि जिग्नेश ठक्कर उर्फ मुनिया यांच्यात हाणामारी झाली होती.



शुक्रवारी रात्री सायंकाळी ५ च्या सुमारास जिग्नेश ठक्कर उर्फ मुनिया हा रात्री पावणेदहाच्या सुमारास त्याच्या कार्यालयातून बाहेर पडला. सद कार्यालयासमोरील सुयश प्लाझा बिल्डींगचे कोपऱ्यावर असलेल्या जनरेटर समोर फोनवर बोलत उभा असतानाच धर्मेश उर्फ नन्नु नितिन शहा व त्याचा ड्रायव्हर जयपाल उर्फ जापान असे दोघे जिग्नेश ठक्कर याचेजवळ आले आणि ते आपसांत काहीतरी बोलू लागले. इतक्यात धर्मेश शहा आणि त्याचा ड्रायव्हर जयपाल उर्फ जापान यांनी पिस्तुलमधून जिग्नेशवर गोळ्या झाडल्या. ४ ते ५ गोळ्या फायर केल्याने जिग्नेश कोसळला. हे पाहून अधुशहमा अन्सारी व अन्य काहीजण जिग्नेशच्या दिशेने धावले असता हल्लेखोर धर्मेश शहा आणि जापान या दोघांनी पिस्तुल रोखून कोई बीच मे आया तो ठोक देंगे, असे धमकावले. त्यानंतर धर्मेश शहा आणि जयपाल उर्फ जापान यांनी त्यांच्यासोबत आलेल्या आणखी २ जणांसह कारसह तेथून पलायन केले. छाती व पोटात गोळ्या घुसल्याने जबर जखमी अवस्थेत पडलेल्या जिग्नेश ठक्कर याला कालीदास चव्हाण याच्या स्कुटरवरून फोर्टीस हॉस्पीटलमध्ये नेले. तथापी तेथिल डॉक्टरांनी जिग्नेशला मृत घोषित केले.

जिग्नेश ठक्कर उर्फ मुनिया याला गोळ्या घालून ठार मारणाऱ्या फरार हल्लेखोर धर्मेश उर्फ नन्नु नितिन शहा याच्याविरुध्द खुन, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी असे १५ ते २० गुन्हे दाखल आहेत. तर मृत जिग्नेश ठक्कर उर्फ मुनिया याच्याविरुध्द खंडणी, जबरी चोरी असे एकूण ५ गुन्हे दाखल आहेत. धर्मेश शहा आणि जिग्नेश ठक्कर हे दोघेही खंडणीच्या एका गुन्ह्यात सहआरोपी आहेत. २९ जुलै रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास शंकरराव चौकात धर्मेश उर्फ नन्नू नितिन शहाचा मित्र चेतन पटेल आणि जिग्नेश ठक्कर उर्फ मुनिया यांच्यात झालेल्या हाणामारीचे परस्परविरोधी गुन्हे बाजारपेठ पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे जिग्नेश व धर्मेश शहा यांच्यात आर्थिक वाद, तसेच आधी झालेल्या हाणामारीच्या खुनशीतून जिग्नेश याचा गोळ्या झाडून त्याला ठार केल्याचे प्राथमिक तपासात दिसून येते. फरार हल्लेखोरांना हुडकून काढण्यासाठी पोलिसांची ५ पथके वेगवेगळ्या दिशांना रवाना करण्यात आली आहेत

# कोरोना विरुद्ध श्रमिक क्रांतीचा कडवा संघर्ष



**देवणी/प्रतिनिधी**

चीन मधुन आलेल्या कोरोना महामारीने जगा बरोबर आपल्या देशात ही तांडव चालवले असुन महाराष्ट्रातल्या ग्रामीण गावाना ही त्यानी लक्ष बनविले आहे. या महामारीचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकामी आपल्या देशातील आरोग्य कर्मचारी, पोलिस कर्मचारी, पत्रकार बांधव व सफाई कामगार यानी जीव धोक्यात घालुन या महामारी विरुद्ध निर्णायक संघर्ष चालविले असुन, त्यांच्या प्रयत्नाला साथ म्हणुन कोरोनाचा भयंकर वाढता प्रभाव रोखण्याच्या दृष्टिने श्रमिक क्रांती अभियान महाराष्ट्र व जीवन विकास सेवाभावी संस्थेकडुन कोरोना विरुद्ध युद्ध पुकारण्यात आले असुन यांचेकडून १ ऑगस्ट २०२० रोजी आण्णाभाऊ साठे जन्म शताब्दी निमित्त नळगीर येथे सामाजिक आतंरासह शासनाच्या नियमाचे पालन करुन जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात स्वच्छता व सामाजिक अंतर या विषयावर मा.विष्णु आदावळे यांनी कोरोनाचा नाश करणेसाठीची विशेष माहीती दिली व आण्णाभाऊंच्या खडतर जीवन प्रवासावर ही त्यांच्या मार्गदर्शनातुन प्रकाश टाकले या कार्यक्रमात दै.दंडाधिकार वृत्त पत्राचे संपादक आर्जुन जाधव यांचे ही मार्गदर्शन झाले, तर या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा.मुरलीधर सुर्यवंशी होते. या कार्यक्रमात नळगीरचे सरपंच संगम शेटकार तसेच ग्रामविकास आधिकारी प्रकाश पवार व संघटनेचे प्रमुख मारुती जयवंतराव गुंडीले हे व मार्गदर्शक व्यंकट गायकवाड़ , ही प्रमुख स्थानी उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे स्थानी माजी सरपंच धर्मपाल नादरगे मा.लक्ष्मणराव सोनवळे मा. लक्ष्मण रणदिवे यांचा सहभाग होता. या कार्यक्रमाचे आयोजन संघटनेचे उपाध्यक्ष राजकुमार सुर्यवंशी, कार्यकर्ते दिपक गायकवाड़ यांनी केले होते तर सूत्रसंचालन विकास बलांडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी किरण जाधव, प्रकाश गोरीले, विवेक गुंडीले, शाम गायकवाड़, बालाजी रणदिवे, इत्यादीनी प्रयत्न केले. तसेच कोरोना विरुद्ध जन जागृतीचा कार्यक्रम देवणी, उदगीर, जळकोट भागातील गावानी घेण्यात येणार असुन नळगीर गावात ही सुरुवात करण्यात आली असल्याची माहीती संस्था संघटनेचे आध्यक्ष कोरोना योध्दा मारुती गुंडीले नळगीरकर यांनी कळविले आहे. सध्या कोरोनाचा संर्सग व त्या आनुशंगाने लावण्यात आलेली आचार संहिता व सामाजिक आंतराचे बंधन लक्षात घेऊन संस्था संघटनेचे त्या त्या गावचे चार कार्यकर्ते हे कार्य पार पाडणार आसल्याची माहीती संस्था संघटनेने कळविले असुन सर्व जनतेने सरकारने दिलेल्या नियमाचे काटेकोरपणे पालन करून या महामारीचा सर्वनाश करण्यास मदत करावे असे आव्हान संस्था संघटनेचे आध्यक्ष कोरोना योध्दा सन्मानित मारुती जयवंराव गुंडीलेसह आनिकेत शिंदे गोविंद शिंदे, काशिनाथ कांबळे, दादाराव गायकवाड़ इत्यादीनी केले आहे.

## डॉ.विजयकुमार निंबाळकर यांच निधन

निलंगा : येथील वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात गेली अनेक वर्षापासून कार्यरत असलेले डॉ.विजयकुमार निंबाळकर यांच काल रात्री उपचारा दरम्यान लातूर येथील अल्फा हॉस्पिटलमध्ये निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते.त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुली, आठ भावंडे, दोन बहिणी असा परिवार आहे. ओबीसीचे जिल्हाअध्यक्ष अजित निंबाळकर यांचे ते बंधू होते. निलंगा तालुका आरोग्य अधिकारी उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. मदनसुरी, अंबुलगा (बु) येथेही त्यांनी आपले कर्तव्य बजावले आहे. त्यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी साडेदहा वाजता निंबाळकर पेट्रोल पंपाच्या शेजारी अंतीमसंस्कार करण्यात आले. यावेळी शोकसभा घेण्यात आली या शोकसभेत दिलीप नाईक, पत्रकार मोहन क्षीरसागर, रिपाई (डे)चे विलास सूर्यवंशी, दयानंद चोपणे, विनोद आर्य, डॉ शाहूराज माकणीकर इत्यादींनी शोक व्यक्त केला.

पान १ वरून...

### संपूर्ण महाराष्ट्र कोरोनाच्या संकटामुळे ...

डॉक्टर दिनेश वर्मा याच्यावर प्राणघातक हल्ला केला. यात डॉक्टर वर्मा जखमी झाले असून या हल्ल्याचे निमित्त करून आता डॉक्टरानी काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. २५/७/२०२० रोजी उदगीरच्या केंद्रे हॉस्पिटल येथून अनारकला हिरालाल सकट (५५) या महिलेला निमोनिया, शुगर व ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यामुळे लातूरच्या अल्फा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्याचवेळी तिच्या नातेवायीकांकडून हॉस्पिटलने ५ लाख रुपये अनामत रक्कम म्हणून घेतली होती असे अनारकला हिच्या मुलाचे म्हणणे आहे. सदर महिलेला अल्फाच्या आयसीयुमध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर २६/७/२०२० रोजी अनारकला हिचे स्वॅब घेऊन ते कोविड तपासणीसाठी लॅबमध्ये पाठवण्यात आले. त्यानंतर तिचा रिपोर्ट पॉझेटिव्ह आल्याने तिच्यावर कोरोनाचे उपचार सुरु करण्यात आले. मात्र तिला कोरोना झालाय ही बाब डॉक्टरांनी तिच्या कुटुंबापासून लपवून ठेवली. मात्र २९/७/२०२० रोजी तिची प्रकृती खालावली. त्यामुळे जुनियर डॉक्टरांनी ही माहिती डॉक्टर दिनेश वर्मा यांना कळवली. तसे दिनेश वर्मा तिथे पोचले, पण अनारकला हिला वाचवू शकले नाहीत. तिचा मृत्यू झाला आणि त्यानंतर जेंव्हा अनारकलाचा मृतदेह तिच्या कुटुंबीयांनी ताब्यात देण्याची मागणी केली, तेंव्हा मात्र हा मृतदेह तुम्ही नेऊ शकत नाही. कारण ती कोरोन बाधित आहे. त्यामुळे पोलिसांना कळवावे लागेल असे सांगितले. ते ऐकून अनारकला हिच्या कुटुंबियांना धक्का बसला. त्यानंतर त्यांनी मृतदेह दाखवा अशी मागणी केली, ती मागणीही फेटाळण्यात आली. तेंव्हा मात्र अनारकलाचे कुटुंबीय संतप्त झाले आणि तिचा मुलगा नटवरलाल याने डॉक्टर दिनेश वर्मा यांच्यावर धारधार हत्याराने हल्ला केला. त्यात ते जखमी झाले असून या प्रकरणी लातूरच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्यात नटवरलाल याच्या विरोधात कलम ३०७, ४ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात अल्फा हॉस्पिटलचे डॉक्टर दिनेश वर्मा यांनी अनारकला या मृत महिलेच्या नातेवाईकांची फसवणूक केली. त्यामुळेच तिच्या मुलाला संताप अनावर झाला आणि त्याने डॉक्टर वर्मावर हल्ला केला.

### डॉ.दिनेश वर्मा पुन्हा वादाच्या...

हॉस्पिटलचे सारखी खाजगी रुग्णालये गरीब रुग्णांना लुटण्याचे धंदे करीत आहेत. अशावेळी एखाद्या रुग्णाच्या नातेवाईकाचा संयम सुटला आणि त्याच्या हातून डॉक्टरला मारहाण झाली, तर त्यात तो एकटाच कसा दोषी ठरू शकतो. अल्फा हॉस्पिटलचे डॉ. दिनेश वर्मा यांनी अनारकला हिला कोरोना झाल्याचे ती मरेपर्यंत तिच्या कुटुंबियांना सांगितले नाही आणि मेल्यावर तिच्या मृतदेहाचा चेहराही दाखवण्यास टाळाटाळ केली. त्यामुळेच तिच्या मुलाचा संयम सुटून डॉ. वर्मा याला मारहाण झाली असेल, पण आता या मारहाणीचे भांडवल करून डॉ. वर्मा शहरातील इतर डॉक्टरांना भडकावून संपूर्ण आरोग्य सेवाच वेठीस धरीत आहेत. त्यामुळे सर्वात प्रथम त्यांच्यावर कारवाई करावी अशी जनतेने मागणी केली आहे. दरम्यान या प्रकरणी लातूरचे वैद्यकीय अधिकारी ढगे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

### भाईगिरी त्याला महागात महागात पडली...

स्वच्छ नव्हता. आतापर्यत त्याच्यावर कागल पोलीस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल झालेले होते.तसा तो गुन्हेगारी गुंड प्रवृत्तीचा असल्याने गावात आणि आपल्या गल्लीत त्याने आपला वचक निर्माण केलेला होता. त्यामुळे अनेकजण त्याला दचकूनच होते. गावात आणि परिसरात बुलेटवरून फिरताना तो कधीच एकटा फिरत नव्हता. त्याच्या मागे कुणी ना कुणी कायम बसलेले असायचे. त्यामुळे तो स्वता:ला दादाच समजत होता.त्यातून त्याची अनेकांच्या बरोबर जशी दोस्ती वाढत होती. तशी दुश्मनी ही वाढत चालली होती. त्याच्याकडे तारूण्याचा जोश आणि उन्माद होता.तो कुणाला ही मी भित नाही. वाघ म्हणूनच जगणार आहे.माझे कुणी ही वाकडे करणार नाही म्हणत होता. एंकदरीत तो पैशाची आणि तारूण्याच्या मस्तीच जगत होता.

नगरपरिषदेचे बांधकामाचे टेंडर मिळत त्याला मिळत असल्याने त्या व्यवसायात त्याला प्रतिस्पर्धी ही निर्माण झालेले होते. त्याचे हे प्रतिस्पर्धी दुसरे तिसरे कुणी नव्हते. तर खुद्द त्याच्या नात्यातील योगेश सोनुले हा होता. तो ही कागल नगरपरिषदेची किरकोळ कामे मिळवित होता. त्यातून त्यांचे बऱ्याच वेळा भांडणे आणि मारामारी ही झालेली होती. त्यामुळे योगेश हा त्याच्यावर चिडून होता. ते दोघे ही महात्मा फुले वसाहतीत राहत असल्याने एकमेकांचे कट्टर वैरी बनले होते. मागे एकदा दोनदा भांडणात आकाश याने त्याला मारहाण ही केलेली होती. ते दोघे ही तसे एकाच भावकितील असल्याने त्यांच्या भांडणाला भावकीची ही किनार होती. त्यामुळे योगेशला कधी एकदा या अक्षयची गेम करतो आणि त्याला कायमचा धडा शिकवितो असे झाले होते. परंतु त्याला मारणे हे त्याच्या एकटच्या हाताने होणार नाही. शिवाय अक्षय बरोबर कायम कुणी ना कुणी असेतच हे त्याला चांगले माहित होते. तो संधीची वाट पाहत होता.त याची गेम करण्याचा तो प्लॅन करीत होता. यासाठी त्याने कोल्हापूर रेल्वे लाईन परिसरात राहत असलेला मित्र धनंजय उर्फ बंडा सपाटे याची मदत घेण्याचे ठरविले होते.त्याने सपाटे याला आपल्या आणि अक्षयच्या दुश्मनी विषयी सांगून आपल्याला त्याची गेम करायची आहे.तु मला मदत कर.तुला मी यासाठी पैशाची मदत करतो असे सांगून तयार केले.त्या दोघांच्यात एकमत झाल्यावर त्यांनी अक्षयला सपंविण्याचा प्लॅन केला.तो कधी तरी कुठे तरी एकटा भेटेलच हे त्याना माहित होते.त्याच्या प्रत्येक बारीक हालचालीवर त्यांनी लक्ष ठेवले होते.तो कधी कुठे जातो,कधी एकटा असतो याची त्यांनी माहिती काढली होती. तसे ते संधीच्या शोधात होते.

ती संधी त्यांना शुक्रवार दि.२५ जुलै रोजी भेटली. श्रावणातील शुक्रवारी लक्ष्मी देवीची पुजा केली जाते. आणि या पुजेसाठी अक्षय हा एकटा जातो हे योगेशला माहित झाले होते. म्हणून त्याने त्या दिवशी सपाटे याला तयार राहयला सांगून आज त्याची कोणत्याही परिस्थीती गेम करायचीच असे त्यांनी ठरविले. शुक्रवार दुपारी २ वाजणेच्या सुमारास अक्षय हा मांतग वसाहतीतील लक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन सांगाव रस्त्याने आपल्या घरी बुलेटवरून एकटाच चालला होता.नेमकी हिच संधी शोधून योगेश आणि धनंजय यांनी त्याला लक्ष्मी मंदिर शेजारी जावून त्याच्या बुलेटच्या आडवी आपली गाडी घातली. आणि त्याला शिव्या देत खाली पाडले. ते दोघेही त्याला मारण्यासाठी तयारीनेच आले होते. एकदम ते दोघे गाडीच्या आडवे आल्याने अक्षय ही बेसावध होता.तो खाली पडला असला तरी त्याना शिव्या देत उठून उभा राहत होता. इतक्यात धनंजय याने आपल्याकडील चटणीची पुड काढून त्याच्या डोळ्यात फेकली. त्याचवेळी योगेशने अक्षयवर तलवारीने १५ ते १६ वार केले. अचानक त्यानी धारदार शस्त्रांनी वार केल्याने आणि अक्षयच्या डोळ्यात चटणी गेल्याने तो काहींच करू शकत नव्हता. त्या दोघांनी त्यावेळी एकटया असलेल्या अक्षयवर तलवारीने सपासप वार करून मर... म्हणून शिव्या देत त्याच्यावर तुटून पडले. त्याच्या पोटावर, डोक्यावर, आणि चेहऱ्यावर तलवारीचे वर्मी घाव बसल्याने त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला होता. तो गंभीर जखमी अवस्थेत विव्हळत जमीनीवर पडला.त्याच्या बाजुला त्याची बुलेट पडली होती. तर तो पडलेल्या ठिकाणी चटणीची पुड पडलेली होती. तर रक्ताच्या थारोळ्यात तो निपचिप पडला होता. त्यावेळी त्याच्या शिवाय रस्त्यावर कुणीच नसल्याने योगेशने आणि धनंजयनी डाव साधला होता. त्याची गेम करून त्या दोघांनी सांगाव रस्त्याने आपल्या दुचकीवरून पळून गेले. जाताना त्यांनी आपल्या हातात रक्ताने माखलेली तलवार उंचावून दाखवून दशहत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यातील योगेशला लोक ओळखत असल्याने मोठया रस्त्यावरून जाताना त्याने रक्ताने माखलेली तलवार बघुन काहीजणांना वेगळीच शंका आल्याने ते आलेल्या रस्त्याने पळत जावून बघितले तर मांतग वसाहतीती लक्ष्मी देवळाजवळील रस्त्यावर अक्षय हा रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडल्याचे त्याना दिसले. त्यांनी या घटनेची माहिती त्याच्या घरच्या लोकांना दिल्यावर ते ही पळतच घटनास्थळी आले होते. त्याच्या आईने आणि बायकोन तर हंबरडाच फोडला होता. त्याच्या बायकोने शेजारच्या लोकांच्या मदतीने अक्षयला एका गाडीतून उपचारासाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात दाखल केले. परंतु त्याचा उपचारापुर्वीच मृत्यु झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान या घटनेची माहिती कागल पोलीसांना मिळाल्यावर घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी अप्पर पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे, करवीर विभागीय पोलीस अधिकारी प्रशांत अमृतकर यांनी भेट देऊन घटनेची पाहणी करून तपास अधिकारी पो.निरी दतात्रय काळे याच्या टिमला तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या.घटनास्थळावर चप्पल, बुलेट आणि एक बाजाराची पिशवी पडलेली होती. या घटनेचा पंचनामा करून तपासाला सुरूवात केली होती.पोलीसांनी या घटनेची माहिती घेऊन संशयीत आरोपीचा शोध चालु केला. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याची माहिती पोलीसांना मिळाल्याने या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी योगेश सोनुले याला तातडीने महात्मा फुले वसाहतीतील त्याच्या राहत्या घरातुन ताब्यात घेऊन त्याला पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केल्यावर त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती त्याने दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी कोल्हापूर येथील रेल्वे लाईनजवळून धनंजय सपाटे याला अटक करून ताब्यात घेतले. त्याने ही आपल्या गुन्हयाची कबुली पोलीससमोर दिली.

मयत अक्षय उर्फ मॅनर्स सोनुले याचा चुलत भाऊ अकाश अनिल सोनुले याने या घटनेची फिर्याद कागल पोलीस ठाण्याला दिल्यावर पोलीसांनी अक्षय ऊर्फ मॅनर्स विनायक सोनुले (वय ३०) याच्या खून प्रकरणी योगेश सोनुले आणि धनंजय उर्फ बंडा सपाटे या दोघांच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ सह दशहत माजविणे कट रचणे, आणि घातक शस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल करून त्या दोघांना कागल येथील प्रथमवर्ग न्यायालया समोर उभे केले असता. मा.न्यायालयाने त्या दोघांना २९ जुलै पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्या दोघांच्या कडून गुन्हयात वापरलेली त्याची दुचाकी,तलवार जप्त केले. या घटनेचा पुढील तपास कागल पोलीस स्टेशनचे पो.निरी.दतात्रय काळे हे करीत आहेत.गुन्हेगारी प्रवृतीचे गुन्हेगार हे कधीच सरळ मार्गी नसतात. त्याचे अनेक जणांबरोबर कशाच्या आणि कशाच्या कारणातून भांडणे आणि वैरवाद होत असतो. त्यातूनच त्यांची दुश्मनी वाढत जाते आणि त्याना शेराला सवा शेर भेटतो. अर्थात त्याच्या बरोबर दुश्मनी करणारे ही गुन्हेगारी प्रवृतीचे असल्याने ते त्याला धडा शिकविण्याचा नादात त्याची गेम करतात आणि आपण ही गुन्हयात अपसुकच अडकतात हेच यातून दिसून येते.

### बापाचा राग त्याने मुलावर काढला...

१३ वर्षांच्या मुलाची निर्घुणपणे हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी रिक्षावाल्याला अटक केली आहे. मालवणी पोलीस ठाणे हद्दीतील धारवली गाव पुलाजवळ, एमटीडीसी प्लॉट नंबर १२९, जोगाई वाडी रोड, मालवणी, मालाड पश्चिम येथील जंगलामध्ये एक धडापासून शिर अलग झालेला मृतदेह सडलेल्या अवस्थेत पडला असलेल्याची माहिती मुख्य नियंत्रण कक्षाकडून १७ जुलै रोजी १२.३० वाजता च्या सुमारास मालवणी पोलिसांना मिळाली होती. ही माहिती प्राप्त होताच पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने व पथक त्वरीत घटनास्थळी रवाना झाले. थोड्याच वेळात पोलीस पथक धारवली गावानजीक असणारे पुलाजवळील एमटीडीसी प्लॉट न.१२९ मधील जंगलामध्ये पोहचले.

त्यावेळी त्यांना एक शिर धडापासून अलग होवून पडलेला बेवारस मृतदेह आढळून आला. पोलिसांनी त्या बेवारस मृतदेहाची पाहणी केली आणि आजूबाजूच्या लोकांकडे चौकशी केली असता, काहीही माहिती अथवा दुवे मिळून आले नाही. लगेच ही माहिती परिमंडळ ११ चे पोलीस उपआयुक्त व सहाय्यक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग यांना देण्यात आली. ते त्वरीत घटनास्थळी हजर झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच फॉरेन्सीक टिमच्या मदतीने घटनास्थळाची बारकाईने तपासणी करून महत्वाचे दुवे प्राप्त करून घेण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी त्या मृतदेहाचा पंचनामा करून ते प्रेत विच्छेदनसाठी रुग्णालयात पाठवून दिले. त्यानंतर पोलीस उप आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ ११ मधील सर्व गुन्हे प्रकटीकरण पथके घटनास्थळी बोलावून घटनास्थळाची बारकाईने पाहणी करण्यात आली व सीसीटीव्ही फुटेजेस प्राप्त करून घेण्यात आले. तसेच पथकातील अधिकारी व अमलदारांना मृतदेहावरील कपड्यांचे, चपलाचे फोटोग्राफ व वर्णन देवून आसपासच्या सर्व पोलीस ठाण्यातील मिसींग तक्रारी शोधण्यात आल्या. सदर पथकांनी केलेल्या चौकशीवरून आरे पोलीस ठाण्यातील गु.र.क्र. २९८/२० कलम ३६३ भादवि गुन्ह्यातील अपहृत मुलाचे वर्णन मयताशी मिळते जुळते असल्याचे आढळले. त्यानंतर पोलिसांनी मुलाच्या नातेवाईकांनी संपर्क साधला. त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. बेपत्ता झालेला आपला मुलगा भेटला की काय या आशेने सर्व नातेवाईक पोलीस ठाण्यात दाखल झाले. पण त्यांचा हिरमोड झाला. कारण पोलीस ठाण्यात त्याना मालवणी भागात आढळून आलेल्या एका बेवारस प्रेताचे घटनास्थळवरून हस्तगत केलेले कपडे व काही वस्तू दाखविल्या. ते कपडे ओळखून तो त्यांचा बेपत्ता, अपहृत मुलगा विद्यानंद कमलेश यादव हाच असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. आता मयत मुलाची ओळख पटली होती. पण त्याचा खून कोणी का आणि कशासाठी केला? याचा उलगडा होणे अजूनही बाकी होते. त्यादृष्टीने पोलीस पथक तपास करू लागले. सुरुवातीला पोलिसांनी मयताच्या नातेवाईकांकडे चौकशी केली. मात्र त्यातून काही सुरू गवसला नाही. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि लाडगे, पोउपनिरी मुलाणी व पथक यांनी फिर्यादीकडे अधिक चौकशी करून मयत मुलाचे मित्र कोण आहेत किंवा त्याची कोणाबरोबर भांडणे अथवा वाद झाला होता, याबाबत माहिती काढली असता, मयत मुलाचे शेजारी राहणारे करण बिरबल बहादुर (वय २३) याच्या बरोबर गल्लीमध्ये भिंत बांधण्यावरून वाद झाला होता अशी माहिती मिळाली. त्यावरून पोलीस पथकाने त्वरीत संशयीत करण बिरबल बहादुर यास ताब्यात घेतले. त्याचेकडे सतत, सखोल व कौशल्यपुर्वक चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलीस ठाण्यात आणून त्याने सदरचा गुन्हा का केला? असा प्रश्न विचारला असता त्याने पुढील प्रमाणे गुन्ह्याची हकीगत सांगितली. करण बिरबल बहादुर आणि मयत मुलाचे आई वडील हे मालवणी भागात शेजारी राहत होते. त्यांच्यात घराशेजारी बांधण्यात आलेल्या छोट्याशा भितीवरून वाद होता. गेली कित्येक वेळा या भितीवरून दोन कुटुंबात भांडणे होत होती. मात्र शेजारी असल्याने यादव कुटूंबियांनी ते फारसे मनावर घेतले नाही. झाले गेले गंगेला मिळाले असे म्हणत ते पुन्हा आपल्या कामी लागायचं. मात्र आरोपी करण बिरबल बहादुर याच्या मनात तो राग खदखदत होता. नेहमी होणारी भांडणे याला कुठे तरी आळा बसला पाहिजे म्हणून तो यादव कुटुंबाला धडा शिकवण्यासाठी काय करता येईल याचा विचार करत होता. अशातच त्याच्या डोक्यात ट्यूब पेटली. यादव याचा १३ वर्षीय मुलगा विद्यानंद कमलेश यादव हा कुटुंबातील लाडका आहे. आपण जर त्याचे अपहरण करून त्याचा काटा काढला तर? असा प्रश्न उपस्थित करून शेवटी तो यादव कुटूंबाला धडा शिकण्यासाठी सज्ज झाला. १६ जुलै रोजी तो विद्यानंद याला रिक्षा शिकवण्याचा बहाण्याने धारवली गाव पुलाजवळ, एमटीडीसी प्लॉट नंबर १२९, जोगाई वाडी रोड, मालवणी, मालाड पश्चिम येथील जंगलामध्ये घेऊन गेला. रात झाल्यावर मुलगा घराकडे जाण्यासाठी हट्ट धरू लागला. तेव्हा आरोपी करण बिरबल बहादुर याने विद्यानंद याचा गळा आवळून त्याची हत्या केली. त्यानंतर त्याचा गळा चिरून मृतदेह जंगलात फेकून दिला. आपले काम फत्ते झाल्यावर आरोपी करण बिरबल बहादुर हा रिक्षा घेऊन घरी आला. काही घडलेच नाही अशा तोऱ्यात तो वावरू लागला. या दरम्यान कमलेश यादव हे आपल्या नातेवाईकसह बेपत्ता झालेल्या विद्यानंद याचा शोध घेत होते. तसेच ते पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार देखील करून आले. तरी आरोपी करण बहादुर चुप्पी साधून हा सर्व खेळ पाहत होता. अखेर पोलीस त्याच्यापर्यंत पोहचले. त्याला अटक झाली आणि या गुन्ह्याला वाचा फुटली. करणं बहादूर याचा या गुन्ह्यात सक्रीय सहभाग असल्याचे व बेपत्ता झालेल्या विद्यानंद कमलेश यादव याचा गळा कापून खुन केल्याचे तपासत निष्पन्न झाल्याने मालवणी पोलिसांनी त्याला अटक १८ जुलै रोजी अटक करून त्याच्या विरुद्ध मालवणी पोलीस ठाण्यात गु .र.क्र.२९८/२० कलम ३६३,३०२, अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास उत्तर प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, परिमंडळ ११ चे पोलीस उप आयुक्त व मालवणी विभागाचे सहा. पोलीस आयुक्त,यांच्या मार्गदर्शनाखाली मालवणी पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने, पोलीस निरीक्षक शेख, कनावजे,सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण, बागडी, लांडगे,पोउपनिरी. मुलाणी, देवडे तसेच चारकोप पोलीस ठाणेचे पोउनि. विजय शिदे, पोशि. उगले व पोह सावंत यांनी अथक परीश्रम घेवून यांनी पार पाडले.

03 TO 09 AUGUST 2020 - Page 7 (CRIME SANDHYA) new:Layout 1 01/08/2020 7:40 PM Page 1



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना मुख्यमंत्र्यांकडून विनम्र अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी दिलेल्या संदेशात ते म्हणतात की, हे वर्ष अण्णाभाऊंच्या जन्मशताब्दीचे आहे. यानिमित्ताने लोकशाहीर अण्णा भाऊंना मानाचा मुजरा. अण्णा भाऊ हे केवळ कलावंत नव्हते, तर त्यांनी लेखक, कवी, लोकशाहीर म्हणून समाजातल्या विषमतेवर बोट ठेवले, कष्टकऱ्यांच्या व्यथांना आवाज दिला. आपल्या पोवाड्यातून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम मना-मनात पोहचवली. आपल्या श्रेष्ठ साहित्यकृतीतून मराठी आणि महाराष्ट्राची वैशिष्ट्ये जगभरात पोहचवली. अण्णाभाऊंचे हे योगदान कित्येक पिढ्यांसाठी प्रेरणादायी असेच आहे. अशा महान साहित्यरत्न अण्णाभाऊंना जयंती निमित्त विनम्र अभिवादन.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना अभिवादन केले आहे. दुर्बल, वंचित, उपेक्षित घटकांना साहित्यात स्थान, समाजात मान आणि व्यवहारात न्याय मिळवून देणारे अण्णाभाऊ थोर समाजसुधारक होते. लोककला, लोकसाहित्य, लोकजीवन, पुरोगामी, सुधारणावादी विचारांचे ते स्वतंत्र विद्यापीठ होते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी देशासाठी, समाजासाठी दिलेल्या योगदानामुळे ते सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. लोकशाहीर अण्णाभाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महान साहित्यिक होते. मानवतावादी लेखक होते. दुर्बल, वंचित, पिडीत, कष्टकरी बांधवांच्या जगण्याचं कष्टमय वास्तव त्यांनी साहित्यातून मांडलं. उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. अण्णाभाऊंनी जीवनभर मानवतावादाचा, शोषणमुक्तीचा लढा लढला. देशाचा स्वातंत्र्यलढा, संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन, गोवामुक्तीचा संग्राम, सामाजिक विषमतेविरुद्धची लढाई अशा अनेक संघर्षात आघाडीवर राहून भूमिका बजावली. राज्यात वैचारिक, सामाजिक, साहित्यिक क्रांती घडवण्याचं मोठं श्रेय लोकशाहीर अण्णाभाऊंना असल्याचं सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

# यंदा गेल्या दहा वर्षातील विक्रमी कापूस खरेदी -बाळासाहेब पाटील

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात यावर्षी पणन विभागाने २१९.४९ लाख क्विंटल विक्रमी कापसाची खरेदी केली आहे. गेल्या दहा वर्षातील ही विक्रमी कापूस खरेदी असल्याचे सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी सांगितले. यासंदर्भात माहिती देताना सहकार मंत्री पाटील म्हणाले, राज्यात हंगाम २०१९-२० मध्ये ४४.३० लाख हेक्टर कापसाची लागवड झाली. पर्जन्यमान सामान्य झाल्यामुळे कापसाचे विक्रमी पीक झाले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कापसाच्या दरामुळे देशाअंतर्गत व राज्या अंतर्गत कापसाचे दर हे कमी होत गेले. शेतकऱ्यांना हमी दरापेक्षा कमी दराने कापसाची विक्री करण्यांची वेळ येवू नये याकरीता राज्यात कापूस पणन महासंघाची नियुक्ती सीसीआयचे सबएजंट म्हणून करण्यांत आली. सर्वप्रथम राज्यामध्ये ४० कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले.सातत्याने कापसाचे पडणारे दर तसेच कोरोनाचा राज्यातील वाढता प्रादुर्भाव आणि वस्त्रोद्योगावर त्याच्या प्रभावामुळे बाजारपेठेमध्ये खाजगी खरेदीदारांची संख्या कमी होत गेली, असेही सहकार मंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना त्रास होऊ नये आणि कापूस खरेदीला विलंब होऊ नये यासाठी सीसीआय व कापूस पणन महासंघाद्वारे अधिकचे कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. कापूस पणन महासंघाद्वारे परिस्थितीनुरुप १२७ कापूस खरेदी केंद्र कोरोना पूर्वी सुरू करण्यात आली होती. कापूस पणन महासंघाकडील पुरेसा सेवक वर्ग उपलब्ध नसल्याने अधिकचे खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी आपत्कालीन परिस्थिती पाहून शासनाने कृषी विभागातील कृषी पदवीधर सेवकांची नियुक्ती जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आली आणि नवीन कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आले. हंगाम २०१९-२० मध्ये एकूण १९० कापूस खरेदी केंद्रावर कापूस पणन महासंघद्वारे कापूस खरेदीचे कामकाज सुरू आहे. कापूस पणन महासंघा द्वारे हंगाम २०१९-२० मध्ये एकूण ३ ३३ लाख शेतकऱ्यांकडून कापसाची खरेदी करण्यात आली आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे एप्रिल महिन्यात कापसाची खरेदी स्थगित ठेवावी लागल्यामुळे शेतकऱ्यांची प्रतिक्षा यादी वाढत गेली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी पावसाळ्यामध्ये देखील मान्सून शेड उभारून कापूस खरेदी मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

राज्यात प्रथमच जून व जुलै महिन्यामध्ये कापसाची खरेदी करण्यात येत आहे. शेतकऱ्यांकडून एकूण ४६०० कोटी रुपयांची कापूस खरेदी करण्यात आली. बहुतांश कापूस हा खरीप २०२०-२१ च्या पेरणी पूर्वी खरेदी करण्यात आला असून शेतकऱ्यांची देयके देखील तत्पूर्वी देण्यांत आली आहेत.



हंगाम २०१९-२० मधील पणन महासंघद्वारे हमीभावाने केलेली खरेदी

राज्यात हंगाम २०१९-२० करिता कापूस पिक-पेरा खालिल क्षेत्र - ४४.३० लाख हेक्टर, अपेक्षित कापूस उत्पादन - ४०७ लाख क्विंटल (कृषी विभागानुसार), कापूस उत्पादक १०, ००० हेक्टरपेक्षा अधिकचा पेरा असलेले तालुके -१४०, सध्यास्थितीत कापसाचे बाजार दर प्रति क्विंटल रु.३८००/४८००, बाजारात विक्रीस येत असलेल्या कापसतील आर्द्रता ८ ते १२ टक्के, कापूस पणन महासंघाचे कापूस खरेदी सुरू केलेले केंद्र संख्या - ७१ तालुके - ८९ केंद्र-१९० फॅक्टरीज, सीसीआयचे कापूस खरेदी नियोजीत केंद्र संख्या -७३ तालुके -८३ केंद्र, महासंघाची हमी दराची कापूस खरेदी क्विंटल दि. २० जुलै.२०२० पर्यत ९०.६१ लाख क्विंटल., सीसीआयची हमी दराने कापूस खरेदी क्विंटल दि.१४ जुलै २०२०१२७.४६लाख क्विंटल. राज्यातील पिक पेरा नुसार साधारणतः होणाऱ्या कापूस उत्पादनाची व खरेदी केलेल्या कापसाची माहिती पुढील प्रमाणे १) राज्यात हंगाम १९-२० करिता कापूस पीक-पेरा खालील क्षेत्र - ४४.३० लाख हेक्टर, २) अपेक्षित कापूस उत्पादक - ४०७ लाख क्विंटल, ३) दि. २१ जुन २०२० पर्यत खरेदी करण्यात आलेला कापूस सीसीआय एकूण १२७.७९ लाख क्विंटल. कापूस पणन महासंघ ९१.७०लाख क्विंटल अशी दिनांक २४ जुलै २०२० पर्यत एकूण २१९.४९ लाख क्विंटल एवढी विक्रमी खरेदी केली आहे.

# लवकरच या सात नवीन मार्गावर देखील धावणार बुलेट ट्रेन

**मुंबई/प्रतिनिधी,** देशातील बुलेट ट्रेनचे नेटवर्क वाढणार असून, भारतीय रेल्वेने हाय स्पीड बुलेट ट्रेनसाठी नवीन ७ मार्गाची निवड केली आहे. यासाठी लवकरच रेल्वे आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) मिळून जमीन अधिग्रहणाचे काम सुरू करेल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली काही दिवसांपुर्वी पार पडलेल्या बैठकीत जमीन अधिग्रहणाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यासाठी ४ सदस्यांच्या समितीचे गठन करण्यात आले आहे.

बुलेट ट्रेन हाय स्पीड कॉरिडोरवर ताशी ३०० किमी वेगाने धावू शकते. तर सेमी हाय स्पीड कॉरिडोरवर ट्रेन ताशी १६० किमी वेगाने धावू शकते. या संदर्भात रेल्वे बोर्डाने एनएचएआयला पत्र लिहित या ७ हाय स्पीड कॉरिडोर संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. यासंदर्भातील प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला जात आहे. भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनवर वेगाने काम सुरू आहे. अहदाबाद ते मुंबई या मार्गावर धावणारी ट्रेन डिसेंबर २०२३ पर्यत सुरू होण्याची शक्यता आहे. या सात नवीन मार्गामध्ये दिल्ली ते वाराणसी (नोएडा, आग्रा आणि लखनऊ), वाराणसी ते हावडा (वाया पटना), दिल्ली ते अहमदाबाद (वाया जयपूर आणि उदयपूर), दिल्ली ते अमृतसर (वाया चंडीगढ, लुधियाना आणि जालंधर), मुंबई ते नागपबर (वाया नाशिक), मुंबई ते हैदराबाद (वाया पुणे) आणि चेन्नई ते म्हैसूर (वाया बंगळुरू) यांचा समावेश आहे.

# भाजपला गळती; १२ आमदारांसह हे खासदार सोडणार पक्ष?

**मुंबई/प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीला विधानसभा निवडणुकीपूर्वी शक्तीहीन करण्यासाठी पक्षात मेगाभरती केली. पण याच मेगाभरतीचे भाजपवर आता बुमरँग होण्याची शक्यता आहे. कारण भाजपचे १२ विद्यमान आमदार आणि एक राज्यसभा खासदार सत्ताधारी महाविकास आघाडीच्या संपर्कात असल्याचे वृत्त आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक निकालानंतर मोठी राजकीय उलथापालथ घडली. शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाच्या मुद्द्यावरून भाजपला धक्का देत काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत जवळीक केल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस या महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. त्यामुळे पक्षांतर करून फसलेले आमदार पुन्हा आता सत्ताधारी असणाऱ्या तीन पक्षांच्या संपर्कात आहेत. या संदर्भातील वृत्त 'इकॉनॉमिक्स टाइम्स' दिले आहे.



पक्ष सोडण्याच्या तयारीत भाजपचे जे आमदार असल्याचे म्हटलं जात आहे त्यामध्ये मराठवाड्यातील ३, पश्चिम महाराष्ट्रातील ५ आमदारांचा समावेश आहे. तसेच शिवसेनेच्या संपर्कात आणखी ४ आमदार असल्याची चर्चा आहे. स्वतःच्या पदाचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला जाण्याचीही या आमदारांची तयारी असल्याचे वृत्त आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेसच्या नेतृत्वाने अद्याप राजीनामे देऊन पुन्हा निवडणूक लढण्याची तयारी असलेल्या आमदारांविषयी निर्णय घेतलेला नाही.

भाजपच्या १२ आमदारांसह एक राज्यसभा खासदारही पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. हा खासदार राष्ट्रवादीत येण्यासाठी इच्छुक असल्यामुळे भाजपचा नेमका हा नाराज राज्यसभा खासदार कोण, अशी चर्चा रंगू लागली आहे. भाजपच्या ७ आमदारांनी विधानसभा निवडणूक निकालानंतर राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांना फोन केल्याची चर्चा काही दिवसांपूर्वी झाली होती. या आमदारांनीही आमदारकीचा राजीनामा देण्याची तयारी दाखवली होती. अजित पवारांना फोन करणारे सातपैकी २ आमदार सातारा जिल्ह्यातील तर एक आमदार पुणे जिल्ह्यातील असल्याचे देखील वृत्त आहे. या आमदारांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्यास त्यामुळे भाजपला मोठा धक्का बसणार आहे.

# अमरावतीत कर्जबाजारी आजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधी**

शेतातील उत्पादनामध्ये झालेली घट आणि पुन्हा या वर्षी दुबार पेरणीच संकट अशा संकटात सापडलेल्या आजारी कर्जबाजारी शेतकऱ्यांने आत्महत्या केली. राजू रामचंद्र बुरघाटे या अल्पभूधारक शेतकऱ्याच्या पत्नीने आजारांवरील उपचारांसाठी कर्ज घेतले होते. ते कसे फेडायच्या या विवंचनेतून त्यांने विहीर झोकून आत्महत्या केली. ही घटना ढाकुलगाव येथे घडली.

मागील तीन वर्षापासून राजू या शेतकरी कर्करोगाने ग्रस्त आहे. तसेच वारंवार होणारी नापिकी. यावर्षी आलेले दुबार पेरणीचे संकट आणि त्यात अजारावर उपचारासाठी पत्नीने काढलेल कर्ज, यामुळे हा शेतकरी कर्ज कसे फेडायचे या चिंतेत होता. राजू या शेतकऱ्याकडे एकूण एक एकर शेती आहे. या शेतीच्या भरवशावर कुटुंबाचा खर्च भागत नसल्याने ते मोलमजुरी करत. दरम्यान तीन वर्षापूर्वी त्यांना कर्करोग या आजाराचे निदान झाले. मागील तीन वर्षात त्यांच्या आजारावर जवळपास तीन लाख रुपये खर्च झाले. अशातच मागील वर्षी ही शेतातील उत्पादन मध्ये झालेली घट आणि या वर्षी दुबार पेरणीच संकट त्यामुळे कर्ज आता फेडावे तरी कसे, या विवंचनेत राजू यांनी आज सकाळी शेतातील विहरीत उडी मारुन आत्महत्या केली. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. दोन्ही मुलांची शिक्षण बाकी आहे. घरचा कर्ता पुरुषच गेल्याने बुरघाटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आम्हाला सरकार मे काही मदत करावी अशी मागणी त्याच्या कुटुंबाने केली आहे.

# भिवंडीतील वळ ग्राम पंचायतीचा मोठा निर्णय

## संपूर्ण गाव साजरा करणार फक्त दिड दिवस गणेशोत्सव

**भिवंडी/अभिजित हिरे**

राज्यासह भिवंडी शहर व ग्रामीण भागात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. वाढत्या कोरोना संकटाला आळा घालण्यासाठी शासन स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र काही ठिकाणी नागरिकांकडून शासन निर्देशांचे पालन होतांना दिसत नाही. अशा परिस्थितीत कोरोनावर मात करण्यासाठी भिवंडीतील वळ ग्राम पंचायतीने मोठा निर्णय घेतला आहे. या वर्षी गावकऱ्यांनी गणेशोत्सव दहा दिवस साजरा न करता संपूर्ण गावात फक्त दिड दिवस गणेशोत्सव साधे पणाने साजरा करण्याचा निर्णय वळ ग्राम पंचायतीने घेतला आहे.

२२ ऑगस्ट पासून राज्यात गणेशोत्सवाची सुरुवात होणार आहे. दिड दिवसांपासून ते पाच व दहा दिवस गणेशोत्सव धूम धडाक्यात साजरा केला जातो. भिवंडीतील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी तर १५ ते २१ दिवस देखील साजरा करण्यात येतो. त्यातच गोदाम पट्टा विकसित झाल्यामुळे वळ ग्रामपंचायत श्रीमंत ग्राम पंचायतींमध्ये गणली जात आहे. त्यातच या गावात देखील दहा दिवसांपर्यत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतो. मात्र सध्या सर्वत्र कोरोनाचे संकट असल्याने गावातील नागरिकांच्या आरोग्याचा विचार



करत संपूर्ण गावात फक्त दिड दिवस गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय वळ ग्रामस्थांनी घेतला आहे. त्याच बरोबर गणेश मूर्तीची उंची देखील दोन ते अडीच फूट उंचीचीच आणावी तसेच दरवर्षी विसर्जनावेळी होणारी महाआरती या वर्षी होणार नसल्याने प्रत्येकाने आपआपल्या घरातच गणेश आरती करून प्रत्येकाने आपआपल्या वेळे नुसार गर्दी होणार नाही याची खबरदारी घेऊन गणेश मूर्ती विसर्जन करण्याच्या सूचना ग्राम पंचायतीने ग्रामस्थांना दिल्या आहेत. विशेष म्हणजे तसा अधिकृत ठरावच वळ ग्रामपंचायतीने घेतला आहे. या महत्वपूर्ण ठरावास गावातील नागरिकांनी देखील सकारात्मक समर्थन दिले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ग्रामीण भागातील तसेच घरगुती गणेशोत्सव साजरा करण्या संदर्भात नागरिकांना सूचना देण्या अगोदरच वळ ग्राम पंचायतीने गावातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घेतलेला निर्णय निश्चितच स्वागताहार्य व महत्व पूर्ण समजला जात आहे. दरम्यान दिड दिवसांचा गणेशोत्सव साजरा करण्या संदर्भात गावातील प्रतिष्ठित, जैष्ठ नागरिक आजी माजी सरपंच यांच्याशी विचार विनिमय करूनच हा दिड दिवस गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे अशी प्रतिक्रिया वळ ग्राम पंचायत सरपंच हर्षदा अरुण भामरे यांनी दिली आहे.

तर तालुक्यात कोरोना बाधीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून प्रशासन आपले काम करत आहे त्यातच गावातील नागरिक व तालुक्याचा सभापती या नात्याने आम्ही हि सुरुवात आमच्या गावातूनच केली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने वळ ग्राम पंचायतीने उचललेले हे पहिले पाऊल राज्यभर समाज परिवर्तनाचे निश्चितच काम करेल अशी मला अशा आहे अशी प्रतिक्रिया वळ गावचे नागरिक व भिवंडी पंचायत समितीचे सभापती विकास भोईर यांनी दिली आहे.

# १०० टक्के निकालाची १४ वर्षापासून परंपरा!

# लिटिल एंजल्स इंग्लिश स्कुलची गरुडझेप

**वाडा/प्रतिनिधी**

श्री साई जनकल्याण संस्था वाडा यांच्या मार्फत १९९९ साली लिटिल एंजल्स इंग्लिश मिडीयम स्कुलची स्थापना करण्यात आली अगदी सुरुवातीला २९ विद्यार्थ्यांनी सुरू झालेली ही शाळा आज जवळपास दोन ते अडीच हजार विद्यार्थी संख्येवर पोहोचली असून सलग १४ वर्षापासून या शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागत आहे.



बुधवारी जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात १०० टक्के उत्तीर्ण विद्यार्थ्यांची हीच परंपरा कायम ठेवत दहावीच्या शर्वरी सचिन पाटील या विद्यार्थिनीला ९६.६०%, ईशा सुनील बाविस्कर हिला ९६.४०% तर दिशा रवींद्र पाटील हिला ९५.४०% इतके भरभरून गुण मिळाले आहेत. शैक्षणिक दर्जा या शाळेचा अतिशय उच्च असून प्रत्येक विद्यार्थ्यावर येथे बारीक लक्ष दिले जाते ज्यासाठी या शाळेत तज्ञ शिक्षकवर्ग आहे. लिटिल एंजल्स शाळेचे सामाजिक कार्य देखील मोठे असून जवळपास शंभराहून अधिक विद्यार्थ्यांना शाळेने दत्तक घेऊन त्यांना मोफत शिक्षण देण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागांतील शाळांना मोफत पाठ्यपुस्तके , दप्तरे व शैक्षणिक साहित्यांचे मोठ्या प्रमाणात वाटप आजवर करण्यात आलेले आहे. आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर या याचबरोबर गरजू व्यक्तींना आर्थिक मदत सुद्धा शाळेच्या वतीने वेळोवेळी करण्यात येते गेल्यावर्षी सांगली - कोल्हापूर येथे आलेल्या महापुरात असंख्य लोकांचे नुकसान झाले यावेळी शाळेने मोफत वह्या, पुस्तक व इतर शालेय साहित्य व मोठ्या प्रमाणावर पाठवले होते.

संस्थेचे कार्य व शैक्षणिक दर्जा बघून संस्थेने वाडा व विक्रमगड अशा दोन शाखा चालू केल्या असून जेथे नर्सरी ते दहावीपर्यत वर्ग सुरू आहेत. वाडा विक्रमगड या दोन शाखांमध्ये जवळपास १०० हून अधिक शिक्षक व इतर कर्मचारी काम करतात ज्यातून रोजगार देण्याचे महत्त्वपूर्ण काम देखील संस्थेने केले आहे. सलग १४वर्षे १००% निकाल देणे ही सोपी गोष्ट नसून ही किमया लिटिल एंजल्स इंग्लिश मिडियम स्कूलने करून दाखवली आहे. या यशाच्या परंपरेबरोबरच विद्यार्थ्यांसाठी नियमित मार्गदर्शन वर्ग तसेच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा याच अनुषंगाने शाळा नेहमी प्रयत्नशील राहिले आहे. गेल्या काही वर्षापासून जर आपण बघितलं तर पालघर जिल्ह्यामध्ये अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत पण वाडा तालुक्यातील एका ग्रामीण भागांमध्ये तब्बल २१ वर्षापासून या शाळेने आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे हे कौतुकास्पद आहे. श्री साई जनकल्याण संस्था व स्कूल चे चेअरमन देवेंद्र रघुनाथ भानुशाली यांचे यात फार मोठे योगदान असून शाळेचा उत्तम निकाल व दर्जा राखण्यात शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा विशेष सहभाग आहे असे चेअरमन भानुशाली अभिमानाने सांगतात.

# वाशिममध्ये बेपत्ता करोनारुग्णाचा मृतदेह आढळला विहिरीत

**वाशिम :** रुग्णालयातून पळालेल्या करोनाबाधित रुग्णांचा मृतदेह विहरीत सापडल्यानं एकच खळबळ माजली आहे. वाशिममध्ये हा धक्कादायक प्रकार घडला असून रुग्णालयातून करोनाबाधित रुग्ण गायब झालाच कसा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. २९ जुलैला रुग्णालयातून करोनाबाधित रुग्णानं पळ काढला. बऱ्याच ठिकाणी शोधा शोध करूनही रुग्णांचा काहीच तसाप लागत नव्हता. अखेर पोलिसांनी त्यांच्या मोबाईल नंबर ट्रेस केला. मोबाईल वरून रुग्णाचा ठावठिकाणा शोधून काढल्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले. तेव्हा एका विहिरीच्या बाजूला त्याचा फोन व त्याचे सामान सापडले.असून वाशिमः रुग्णालयातून पळालेल्या करोनाबाधित रुग्णांचा मृतदेह विहरीत सापडल्यानं एकच खळबळ माजली आहे. वाशिममध्ये हा धक्कादायक प्रकार घडला असून रुग्णालयातून करोनाबाधित रुग्ण गायब झालाच कसा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. पोलिसांनी रुग्णांच्या नातेवाईकांना बोलावून विहिरीलगत सापडलेल्या वस्तूंची ओळख पटवून घेतली. ओळख पटल्यानंतर पोलिसांनी अधिक शोधाशोध केल्यानंतर विहरीत मृतदेह असल्याचं आढळून आलं. या रुग्णानं आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज वाशिम पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिसांनी रुग्णांच्या नातेवाईकांना बोलावून विहिरीलगत सापडलेल्या वस्तूंची ओळख पटवून घेतली. ओळख पटल्यानंतर पोलिसांनी अधिक शोधाशोध केल्यानंतर विहरीत मृतदेह असल्याचं आढळून आलं. या रुग्णानं आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज वाशिम पोलिसांनी व्यक्त केला आहे.

03 TO 09 AUGUST 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 01/08/2020 7:41 PM Page 1



# रुग्णांसाठी तात्काळ लोकल सेवा खुली करा

## आमदार हितेंद्र ठाकूर यांची पंतप्रधान व रेल्वे मंत्र्यांकडे मागणी

**विरार/प्रतिनिधी**

वैद्यकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना ज्या प्रमाणे लोकल प्रवासाची मुभा देण्यात आली आहे, त्याच पद्धतीने हृदय रोग, कॅन्सर, किडणीचा आजार या सारख्या गंभीर व्याधीने त्रस्त असलेल्या रुग्णांनाही मुंबईतील रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यास जाण्यासाठी लोकल ट्रेनच्या प्रवासाची परवानगी द्यावी अशी मागणी बहुजन विकास आघाडीचे संस्थापक आणि वसईचे आमदार लोकनेते हितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षितिज ठाकूर यांनी केली आहे. सध्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्या चार महिन्यांपासून देशात लॉकडाऊन सुरू आहे. त्याचा परिणाम वसई, विरार, नालासोपारा भागात सुद्धा जाणवला. मात्र या कठीण काळात बहुजन विकास आघाडीने गोरगरीबांना मोठ्या प्रमाणावर धान्य वाटप केले. तसेच आजारी रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत केली. या कठीण काळात वसई, विरार, नालासोपारा येथील जनतेच्या पाठी बहुजन विकास आघाडी आणि लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर खंबीरपणे उभे राहिले. मात्र या परिसरातील कित्येक गंभीर रुग्णांची मुंबईतील केईएम, जेजे, टाटा, नायर, भगवती यासारख्या सरकारी रुग्णालयात ट्रीटमेंट सुरू होती. पण सार्वजनिक परिवहन सेवा बंद असल्याने रुग्णांचे हाल सुरू होते. यातील बऱ्याच रुग्णांना बहुजन विकास आघाडीने





स्थानिक खाजगी रुग्णालयात वैद्यकीय सेवा मिळवून दिली आणि त्यांचे प्राण वाचवले. दरम्यान जुलै मध्ये सरकारने अनलॉकची प्रक्रिया सुरू केली. याच प्रक्रियाच एक भाग म्हणून अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी लोकल सेवा सुरू करण्यात आली. त्यात सरकारी कर्मचारी तसेच रुग्णालये कर्मचारी यांना लोकल प्रवासाची मुभा देण्यात आली. पण रुग्णांना मात्र लोकल प्रवास नाकारण्यात आला. त्यामुळे केवळ वसई विरारच नव्हे तर मुंबईची उपनगरे तसेच कल्याण डोंबिवली, अंबरनाथ, आसनगाव, वाशी, बेलापूर, पनवेल इथल्या रुग्णांना मुंबईत उपचारासाठी येणे अवघड झाले. त्यामुळे कित्येकांचा घरातच तडफडून मृत्यू झाला. मात्र कुठल्याही पक्षाने याबाबत आवाज उठवला नाही. पण बहुजन आघाडीचे आमदार हितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षितिज ठाकूर यांनी या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला. हितेंद्र ठाकूर यांनी रेल्वेच्या सर्व बड्या अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधून या अन्यायाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच रुग्णांनाही लोकल सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी थेट पंतप्रधान, रेल्वे मंत्री यांना पत्र लिहून केली. क्षितिज ठाकूर यांनीही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना पत्र लिहून हृदय रोग, कॅन्सर, किडणी यासारख्या गंभीर आजाराच्या रुग्णांना लोकल प्रवासाची मुभा द्यावी अशी मागणी केली असून या मागणीचा बहुजन विकास आघाडीतर्फे सतत पाठपुरावा केला जात आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करण्यात आली आहे.

# मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांना तडीपारीची नोटीस

**विरार/प्रतिनिधी**



आक्रमक आंदोलनांसाठी ओळखले जाणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांना तडीपारीची नोटीस बजावण्यात आली आहे. वसई पोलिसांनी ही कारवाई केली आहे. वसई-विरार महापालिकेत केलेल्या आंदोलनांसाठी जाधव यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे. विरारच्या उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालानं जाधव यांना ४ ऑगस्ट रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितलं आहे. ठाणे महापालिका मुख्यालयासमोर परिचारिकांसाठी आंदोलन करत असताना जाधव यांना ही नोटीस मिळाली. फेसबुकच्या माध्यमातून त्यांनी याबाबत माहिती दिली.

त्यानुसार ठाणे, ठाणे ग्रामीण, बृहन्मुंबई, रायगड या भागातून त्यांना दोन वर्षासाठी हद्दपार करण्याचा प्रस्ताव आहे. त्याबाबत त्यांना पोलिसांसमोर जाऊन स्पष्टीकरण द्यावं लागणार आहे. जाधव यांनी यावर प्रतिक्रिया देताना राज्य सरकारवर जोरदार तोफ डागली. 'मुंबई, ठाण्यात एवढे गुंड आहेत. त्यांना कधी अशा नोटिसा येत नाहीत आणि लोकांसाठी आंदोलनं करणाऱ्यांना तडीपारीच्या नोटिसा पाठवल्या जात आहेत. लोकांसाठी काम केल्याबद्दल, कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्यांसाठी बसेस सोडत असल्याबद्दल राज्य सरकारनं दिलेलं हे बक्षीस आहे, असं अविनाश जाधव म्हणाले.

दरम्यान हद्दपारीची नोटीस आल्यानंतरही जाधव यांनी आंदोलनं सुरूच ठेवली आहेत. करोना रुग्णालयातील परिचारिकांसाठी आज त्यांनी ठाणे महापालिकेच्या मुख्यालयासमोर आंदोलन केले. परिचारिकाही या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. आंदोलक परिचारिकांना महापालिकेने नियुक्त केले होते. आता ठेकेदाराच्या माध्यमातून काम करण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जात आहे. त्याविरोधात जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज मनसैनिकांनी आंदोलन केले. परिचारिकाच्या आंदोलनामुळे परिस्थिती चिघळू नये म्हणून जाधव यांना ठाणे पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

# महिला आर्थिक विकास महामंडळाकडून महिलांना अर्थसहाय्य; ४७ लाख रुपयांच्या धनादेशाचे वाटप




**वाडा/प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेसच्या माध्यमातून वाडा तालुक्यातील महिला बचत गट आणि ग्रामसंघाद्वारे महिलांना सुमारे ४७ लाख रुपयांच्या अर्थसहाय्याचं वाटप गुरुवारी वाड्यातील पंचायत समितीच्या प्रशिक्षण सभागृहात करण्यात आले.


महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), पालघरच्या मानव विकास, कार्यक्रमाच्या अंतर्गत स्वप्नसाकार लोकसंचित साधन केंद्र, वाडा व माहेर लोकसंचित साधन केंद्र, कंचाड च्या वतीने तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस अंतर्गत वाडा येथे झालेल्या एका कार्यक्रमात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, पालघर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष भारती कामडी यांच्या हस्ते या धनादेशाचं वाटप करण्यात आले. यावेळी वाडा तालुक्यातील १९ गावांमधील सुमारे ४७९ महिलांना अर्थसाहाय्य देण्यात आले. अर्थसहाय्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगार उभा करण्यासाठी मदत होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी वाडा पंचायत समितीचे सभापती योगेश गवा, गटविकास अधिकारी राजलक्ष्मी येरपुडे, माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वयक अधिकारी अरविंद गोरे आदी उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त मातंग जनशक्ती संकल्प अभियान

**वसई/प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवी वर्षात मातंग जनशक्ती संकल्प अभियाना अंतर्गत वेबिनार आयोजित करण्यात आले असून त्याची सुरुवात १ ऑगस्ट २०२० रोजी सायंकाळी ७ वाजता मातंग समाजातील डॉ. राजू पाटोळे यांच्या व्याख्यानाने होणार आहे. या वेबिनारचा उद्देश मातंग समाजातील अस्तित्वात असलेली विविध बलस्थानं एकत्रीत करून मातंग समाज दखलपात्र व निर्णायक कसा होऊ शकतो यासाठी धोरणात्मक कृती कार्यक्रम तयार करण्यासाठीचा अपेक्षीत आहे.

आपली वेगवेगळी शक्तीशाली बलस्थानं आहेत त्यांची फक्त वज्रमुठ आवळणे गरजेचे आहे. राजकिय क्षेत्रातील सर्व सक्षम नेते. विविध सामाजिक चळवळीत सक्रिय असलेली सक्षम नेते. जातीच्या विविध विषयांवर आक्रमक असणारे सामाजिक संघटनांचे सक्रिय नेते. सामाजिक बांधिलकी जपणारे अधिकारी, कर्मचारी वर्ग. व्यवसाय, कला क्रिडा, साहित्य या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणारा वर्ग. ही सर्व मंडळी त्या-त्या क्षेत्रात निपूण आहेत,विद्वान आहेत, सक्षम आहेत व सक्रिय आहेत. पण आपणच आपल्या या हिऱ्यांची पारख करण्यात कमी पडलोत. किंबहुना जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून एकदुसऱ्यांबद्दल अपप्रचार करून समज-गैरसमज निर्माण केले व त्या व्यक्तीमत्वाचा अनादर करून अविश्वासाचं वातावरण निर्माण केलं व परस्पर विरोधी तयार झालो. यामुळे आपण असंघटीत होत गेलो व परिनामी समाजाचं न भरून निघणारं नुकसान करून घेतलं. या थोर महापुरूषाच्या जन्मशताब्धी वर्षात मनाचा मोठेपणा दाखवत प्रत्येकाने एकत्र येण्याची भावना व्यक्त केली व समाजालाही आव्हान केले. ज्याची आपण अनेकवर्षे प्रतिक्षा करत होतो. आपला समाज दखलपात्र न होण्यास कुठेतरी आपणही जबाबदार असल्याची जानीव आज प्रत्येकाला होत असावी म्हणूनच आपण एकत्र येण्यासाठी एक दुसऱ्यांबरोबर संवाद करत आहोत आणि हे सकारात्मक आहे व हिच खरी आपल्या एकतेची नांदी ठरू शकते.ही वज्रमुठ आवळण्यासाठी गरज आहे आपल्या सर्व संघटनांनी सांघिक प्रयत्न करण्याची. आणि हाच संकल्प आपण या जन्मशताबधी वर्षात निस्वार्थ भावनेने व संपुर्ण विश्वासाने घ्यावा या साठी हे वेबिनार आयोजित करण्यात आले आहे. या वेबिनारमध्ये समाजातील सर्व क्षेत्रातील मान्यवर निमंत्रीत आहेत ते त्यांची भूमिका स्पष्ट मांडतील वकोणत्या विषयांवर आपण एकत्र येऊ शकतो त्यासाठी कृती कार्यक्रम काय असावा व धोरणात्मक मुद्दे कोणते असावे ? यावर सर्वाच किमान समान कार्यक्रमावर एकमत घडवून आणतील व महाराष्ट्रातील मोठी लोकसंख्या असलेला हा मातंग समाज



जनशक्तीच्या रूपाने. भविष्याची वाटचाल करण्यास तयार होईल व स्वकर्तृत्व सिद्ध करेल अशी रास्त अपेक्षा आहे. या ठिकाणी येण्यास आपल्याला कुठल्याही विचारधारेची, राजकियपक्षांची, संघटनांची किंवा चळवळींची कसलीही बंधनं नाहीत फक्त जातीला संघटीत ताकद बनविण्यासाठी दखलपात्र बनविण्यासाठी आपले योगदान अपेक्षीत आहे.

# महावितरणच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याचा मृत्यू

## प्रहारच्या आक्रमक पवित्र्यामुळे शेतकरी कुटुंबाला मिळाली आर्थिक व शासकीय मदत

**सोलापूर/प्रतिनिधी**

विजेच्या धक्क्याने अवघ्या ३३ वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोलापुरात घडली आहे. तर महावितरणच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा मृतांच्या नातेवाईकांनी केलाय. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षीहिप्परगा गावातील ही दुर्दैवी घटना आहे. अरुण खांडेकर असे या ३३ वर्षीय मृत शेतकऱ्याचे नाव आहे. अरुण खांडेकर यांच्या शेतात मागील ५-६ महिन्यापूर्वी वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब पडून होते. याप्रकरणी खंडेकर यांनी वारंवार तक्रार देखील दिली होती. मात्र तरी देखील कोणतीही कारवाई न केल्याने प्रकार घडल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केलाय. सकाळी ११ वाजता हा प्रकार घडल्यानंतर संध्याकाळी ४ वाजेपर्यंत महावितरणचे अधिकारी येतील यासाठी मृतदेह गावातच ठेवण्यात आलं. त्यांनतर संध्याकाळी ४ वाजता सोलापुरात शवविच्छेदनसाठी शासकीय रुग्णालयात शव आणण्यात आलं. दरम्यान नुकसानभरपाई दिल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका कुटुंबियांनी घेतली आहे. तर नुकसान भरपाई न दिल्यास मृतदेह महावितरणच्या कार्यालयात घेऊन जाण्याचा इशारा प्रहार संघटनेने दिला आहे. सदरील घटनेची माहिती कळतात दक्षिण सोलापूर तालुक्यातील



महावितरणचे अधिकारी देखील शासकीय रुग्णालयात दाखल झाले. रात्री उशिरापर्यत कुटुंबियांची समजूत घालण्यासाठी प्रयत्न सुरू होते. मात्र कुटुंबिय आपल्या मागणीवर ठाम होते.आज सकाळी प्रहार जनशक्ती पक्ष व शेतकरी संघटनेचे शहर प्रमुख अजित कुलकर्णी व शहर संपर्क प्रमुख जमीर भाई शेख ,कार्यकारी प्रमुख खालिद मणियार यांच्या नेत्वाखालील प्रहारचे असंख्य कार्यकर्ते शासकीय रुग्णालयात दाखल झाले आणि एमेसिबी च्या अधिकाऱ्यांबरोबर होत झाल्या सुरुवात झाली याची दखल घेऊन तातडीने याठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त बोलावण्यात आला. चीशल च्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी येऊन सदरच्या मृत शेतकरी यास काही रक्कम रोखीने मदत केली आणि शासनामार्फत तातडीने जेवढे शक्य होईल तेवढे लवकर चार लाखाची मदत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर मृतक शेतकऱ्याचे प्रेत ताब्यात घेऊन नातेवाईकांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केला. प्रहार जनशक्ती पक्ष व शेतकरी संघटनेने घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे अखेर बक्षी हिप्परगा येथील शेतकरी यास न्याय मिळाला आहे. याप्रसंगी चर्चमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे संतोष भाऊ पवार प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटनेचे शहर प्रमुख अजित कुलकर्णी, शहर संपर्क प्रमुख जमीर भाई शेख, कार्यकारी प्रमुख खालिद भाई मणियार, मजीद पटेल, महेश शिंगडे मुदस्सर हुंडेकरी निखिल बिराजदार आदी मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुडूसमध्ये भाजपची निदर्शने; सरकार विरोधात घोषणाबाजी

**वाडा/प्रतिनिधी**

आपल्या विविध मागण्यांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज कुडूस नाका येथे भाजप वाडा तालुका शाखेच्या वतीने जोरदार निदर्शने करून आघाडी सरकारचा निषेध नोंदवला. यावेळी सर्वच पातळीवर अपयशी ठरलेल्या महाविकास आघाडी सरकारचा धिक्कार करण्यात आला.जोरदार घोषणाबाजी केल्याने कुडूस नाका दणाणून गेला होता. यावेळी लॉकडाउन काळात महावितरणने भरमसाठ वीज बीले ग्राहकांना पाठवल्याने बीलांची होळी करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. हेमंत सवरा यांनी केले.त्यांनी आपल्या भाषणात आघाडी सरकारवर टीकास्त्र सोडले. 'या सरकारचे करायचे काय; खाली डोकं वर पाय, महाविकास आघाडी सरकारचा धिक्कार असो; धिक्कार असो, आघाडी सरकार; हाय हाय अशा घोषणा दिल्याने कुडूस नाका दणाणून गेला होता. गाईच्या दुधाला प्रतिलिटर दहा रूपये तर दुध खरेदीचा दर प्रतिलिटर ३० रूपये व दुध



भुकटी निर्यातीला प्रति किलो ५० रूपये अनुदान द्या, लॉकडाऊन काळात भरमसाठ आलेली वीज बिले माफ करा, वाडा- देसाई, कांबारे- पिवळी रस्त्याची तत्काळ दुरूस्ती करा, डाकिवली- लोहोपे रस्त्याचे मंजूर झालेले काम तत्काळ सुरू करा आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. भाजपचे तालुका अध्यक्ष मंगेश पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविकास आघाडी सरकार सर्वच पातळीवर सपशेल अपयशी ठरल्याचे सांगून सरकारने आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास यापुढे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष संदीप पवार, मनिष देहेरकर, जगन्नाथ पाटील, राजू दळवी, धनश्री चौधरी, मेघना पाटील, अंकिता दुबेले, निलिमा भोये,अर्चना भोईर, कुणाल साळवी आदी पदाधिका-यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# सांगलीत आंदोलकांकडून गाड्या अडवून गरिबांना दुग्ध वाटप

**सांगली/प्रतिनिधी**

दूध उत्पादकांच्या विविध मागण्यांसाठी पुकारण्यात आलेल्या दूध बंद आंदोलनाला शनिवारी सकाळी सुरुवात झाली. रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी पंढरपुरात संत नामदेव पायरीला विठ्ठलाच्या मूर्तीला दुग्धाभिषेक करुन आंदोलनाची सुरुवात केली. तर शिर्डीच्या पुणतांब्यातही शेतकऱ्यांनी बळीराजाच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करत आंदोलन सुरु केले. यावेळी शेतकऱ्यांनी दुधाला भाव मिळालाच, पाहिजे अशी घोषणाबाजीही केली. तर सांगलीच्या इस्लामपूर येथे शेतकऱ्यांनी नेहमीचा आक्रमकपणा सोडत स्वागतार्ह पाऊल उचलले. याठिकाणी रयत क्रांतीचे नेते सागर खोत यांच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी दुधाचे टँकर अडवून



त्यामधील दूध गरिबांना वाटून टाकले. काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी हजारो लीटर दूध रस्त्यावर ओतून सरकारचा निषेध केला होता. त्यामुळे आज इस्लामपूरमध्ये आंदोलक वेगळा मार्ग चोखाळताना दिसले. दरम्यान, आता राज्याच्या विविध भागांमध्ये दूध आंदोलनाला सुरुवात झाली आहे. दुधाला प्रति लिटर किमान ३० रुपये भाव मिळावा यासाठी राज्य सरकारच्या वतीने प्रति लिटर १० रुपयांचे अनुदान सरळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करा, २६ जून रोजी केंद्रातील मोदी सरकारने नोटिफिकेशन काढून बाहेरच्या देशातून १० लाख टन दूध पावडर आयात करण्याचा घेतलेला शेतकऱ्यांचा घात करणारा निर्णय तातडीने रद्द करा, जेनेरिक मेडिसीनच्या निर्यातीच्या बदल्यात अमेरिकेतून दूध व दुग्ध पदार्थाच्या आयातीला परवानगी देण्याचा केंद्र सरकारने घेतलेला निर्णय तातडीने रद्द करा, आणि देशांतर्गत गोदामांमध्ये पडून असलेल्या दूध पावडरला निर्यातीसाठी प्रति किलो किमान ५० रुपये अनुदान द्या, या मागण्यांसाठी किसान सभा, दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती व समविचारी संघटनांच्या वतीने २० जुलैपासून राज्यात आंदोलन सुरू आहे.




क्राईम Reporter

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.